रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌ वर्ष ७९ ▌ अंक ३४२ ▌ पृष्ठे ८ ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

## मंडळ अधिकारी लाच घेताना अटक

**पनवेल :** पनवेल तहसील कार्यालयातील लाचखोरी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी तहसील कार्यालयाच्या परिसरात सापळा रचून मंडळ अधिकारी गोवर्धन माने याला लाचेची तीस हजार रुपये रक्कम स्वीकारताना पनवेल तक्का येथील मिठास स्वीट समोर रंगेहाथ ताब्यात घेतले. गावदेवीपाडा येथील उताऱ्यावर नाव नोंदीसाठी रकमेची मागणी करण्यात आली होती. या कारवाईमुळे शासकीय कार्यालयातील दलाली आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पान २ वर


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २१ मे २०२६

किंमत ४ ₹


## वाशीत १.२६ कोटींचे कोकेन जप्त

नवी मुंबई : अंमली पदार्थांच्या बेकायदा व्यापाराविरोधात नवी मुंबई गुन्हे शाखेने वाशी परिसरात केलेल्या धडक कारवाईत मोठा साठा उघडकीस आला असून तब्बल १ कोटी २६ लाख २५ हजार रुपये किंमतीचा कोकेन जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत तीन नायजेरीयन नागरिकांना अटक करण्यात आली आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात नशा मुक्त भारत २०२८ या अभियानाच्या पार्श्वभूमीवर अंमली पदार्थांविरोधात कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेकडून शहरातील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत असून पान २ वर

## उरण, पनवेलमधील

# वन जमीन संकटात

**अधिकारात नसताना वन शेरा काढण्याचा तत्कालीन प्रांताचा प्रताप**

**विभागीय आयुक्तांना महसूल मंत्र्यांकडून चौकशीचे आदेश**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चाणजे आणि पनवेल तालुक्यातील मोर्बे येथील वन जमिनी संकटात आल्या आहेत. तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्याने वन जमिनीचे शेरे हटवून खासगी कामांसाठी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी महसूलमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली असून त्यांनी विभागीय आयुक्तांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये तत्कालीन उपविभीगीय अधिकारी अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



### कोकण आयुक्तांचा अहवाल सादर

आदिवासी आदिम सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी महसूल मंत्र्यांकडे तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत चौकशी करून पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. राहुल मुंडके यांनी आदिवासी जमीन जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता अवैधरित्या हस्तांतरित केलेल्या प्रकरणाची चौकशी करून सदरहू अहवाल कोकण विभागीय आयुक्तांनी शासनास सादर केलेला आहे.

उरण तालुक्यातील चाणजे येथील सर्वे नंबर ४९/१/अ, ४९/१/अ एकूण क्षेत्र ०.८८.०० हे आर आणि पनवेलमधील मोरबे येथील सर्वे नंबर २५५/० क्षेत्र ११.८०.२० हे आर या जमिनीच्या सात बारा मधील इतर अधिकारात वन विभागाचा शेरा होता. या जमिनीस भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ (३) व ३५(१) अन्वये सन १९६१ मध्ये नोटीस बजावण्यात आल्याची नोंद वन विभागाच्या रजिस्टरमध्ये आहे. सदरहू कलमान्वये नोटिसा बजावण्यात आलेल्या असल्याने, वन विभागाचा शेरा काढायचा असल्यास त्यास वन संरक्षण अधिनियम १९८० कलम २अन्वये केंद्र शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. तत्कालीन उप विभागीय अधिकारी पनवेल राहुल मुंडके यांनी केंद्र शासनाची परवानगी न घेता, अधिकार नसताना वन विभागाचा शेरा काढून टाकण्याचे बेकायदेशीर आदेश सन २०२३-२४ मध्ये पारित केले असून सात बारा मधील वन शेरा काढून टाकून त्या जमिनीवर अवैध उत्खनन करून मोठे रिसॉर्ट उभारण्याचे काम सुरू आहे. ही बाब अत्यंत गंभीर आगामी काळात वने नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे. आदेश पारित करताना महाराष्ट्र खासगी वन संपादन अधिनियम १९७५ मधील कलम ६ आणि कलम २२ (अ) या कायद्यातील तरतुदींचा जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सर चुकीचा अर्थ लावून, चुकीचे आदेश पारित करून शासनाची फसवणूक केली आहे. केंद्र शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय वन विभागाचा शेरा काढून टाकण्याची कोणतीही तरतूद पान २ वर




## वेधक

### खोपोलीत चार किलो गांजा जप्त

**खोपोली :** खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे व त्यांच्या टीमने खोपोलीत एक धडक कारवाई केली असून गुप्त माहिती द्वारा शहरातील पटेल नगर भागात एका घरात आई व तिचा मुलगा हे गांजा विक्री करतात अशी माहिती पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या टीमला मिळाली होती त्यानुसार आज दुपारी पटेल नगर येथील रस्त्यालाच लागून असणाऱ्या एका घरात पोलिसांनी धाड टाकून जवळपास चार किलो गांजा जप्त केला. या घरातून एक वयस्कर महिला व तिचा मुलगा असे दोघेजण हा गांजा विक्रीचा व्यवसाय करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी दिली.

### वालोपे येथे भीषण अपघात

**रत्नागिरी :** मुंबई-गोवा महामार्गावर वालोपे येथे बुधवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन लहान बालकांचाही समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट २५ ते ३० फूट खोल दरीत कोसळल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मारुती कंपनीची इर्टिका या क्रमांकाची कार मुंबईहून चिपळूणच्या दिशेने येत होती. बुधवार, २० मे रोजी पहाटे सुमारे ४.२५ वाजण्याच्या सुमारास वालोपे येथील एचपी पेट्रोल पंपासमोर आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव वेगातील कार रस्त्याच्या कडेला असलेल्या कठड्याला धडकून थेट खोल दरीत कोसळली. पान २ वर

### खारपाडा टोलमाफीचा ‘गाजावाजा’ फुसका

**पेण :** खारपाडा टोल नाक्यावर वाहनधारकांना टोलमाफी मिळाल्याचा दावा करत गेल्या दोन-तीन दिवसांपासून काही राजकीय मंडळींकडून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात गाजावाजा करण्यात येत होता. एमएच-०६ आणि एमएच-४६ पासिंगच्या वाहनांना टोलमाफी अशा पोस्ट व्हायरल करून स्वतःची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न काही चमकू नेत्यांकडून सुरू होता. मात्र प्रत्यक्ष खारपाडा टोल नाक्यावर जाऊन केलेल्या ग्राउंड रिपोर्टमध्ये वास्तव काही वेगळेच समोर आले आहे. टोल नाक्यावर प्रत्यक्ष पाहणी करून तेथील टोल कंपनीचे व्यवस्थापक राजेश कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली असता, टोलमाफीबाबतची पान २ वर

### कंटेनरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**रसायनी :** बारवाई पुलाजवळ एका कंटेनर चालकाने वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत, कोणताही पूर्व इशारा किंवा पार्किंग सिग्नल न देता आपला कंटेनर धोकादायक वळणावर उभा केल्याने सदर कंटेनरवर धडकून एका दुचाकीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अपघात होताच कंटेनरचालक फरार झाला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव आकाश दादु पवार (२३) असे असून तो खालापूर तालुक्यातील नढाळ येथील रहिवासी आहे. आकाश आपल्या दुचाकीवरून (एमएच ४६ सीजे ०९०५) बारवई पुलाजवळून जात असताना येथील डाव्या बाजूच्या पान २ वर

# औषध विक्रेते संपावर

## ऑनलाईन औषध विक्रीविरोधात एल्गार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

ऑनलाईन औषध विक्रीविरोधासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्ह्यातील औषध विक्रेते रस्त्यावर उतरले आहेत. बुधवारी (दि.२०) संपावर गेले आहेत. जिल्ह्यातील दोन हजार औषध विक्रेते या बंदमध्ये सहभागी झाले आहेत. त्याचा फटका जिल्ह्यातील रुग्णांना बसला आहे. अत्यावश्यक सेवा वगळता इतर आजारपणासाठी लागणारे औषधे विक्री दुकान बंदमुळे रुग्णांचे प्रचंड हाल झाले आहेत. मागण्यांकडे दुर्लक्ष राहिल्यास हा लढा असाच सुरु राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या नेतृत्वाखाली बंद पाळण्यात आला आहे. रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर असोसिएशनमार्फत बुधवारी सकाळपासून औषधी विक्रीची दुकाने बंद ठेवली. सकाळी दवाखान्यातून मेडीकलमध्ये औषधे घेण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना परतीचा मार्ग स्विकारावा लागला. औषध विक्रीची दुकाने बंद असल्याने याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर झाला. मात्र रुग्णांच्या आरोग्याची गरज लक्षात घेऊन अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आली आहे.

औषध विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, ऑनलाईन औषध विक्रीमुळे औषध क्षेत्रातील अनेक नियमांचे उल्लंघन होत आहे. काही ठिकाणी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेषतः अँटीबायोटिक्सचा चुकीचा वापर वाढण्याबरोबरच बनावट औषधांचा धोका वाढल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. रुग्ण आणि फार्मासिस्ट यांच्यातील प्रत्यक्ष संवाद कमी होत असल्याने औषधांच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन मिळत नसल्याची बाबही अधोरेखित करण्यात आली आहे.

मोठ्या कॉर्पोरेट कंपन्या आकर्षक सवलती देऊन बाजारपेठ काबीज करत पान २ वर

# डॉक्टरसह दोघेजण एसीबीच्या जाळ्यात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातील डॉक्टरासह स्वच्छता अधिकारी एसीबीच्या जाळ्यात अडकला. मंजूर कामाच्या एका वर्षाच्या बिलाच्या रकमेवर एक लाख ४० हजार रुपयांची लाच घेताना त्यांना पकडण्यात आले. नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. ठेकेदाराकडूनच ही मागणी केल्याची माहिती समोर आली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. दिपक आवटे आणि समिर म्हात्रे असे या दोन आरोपींची नावे आहेत. नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य कार्यालयातील उपसचिव म्हणून दिपक आवटे कार्यरत होते. पान २ वर






# शेतकऱ्यांचा सरकारविरोधात ७ जूनला मेळावा

## • तिसरी मुंबई विरोधी संघर्ष समितीचे माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसेपाटील यांना साकडे



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

२५ हजार शेतकऱ्यांनी हरकती नोंदवूनही त्याची साधी दखल न घेता तिसरी मुंबई प्रकल्प येथील १२४ गावांवर लादणाऱ्या राज्य सरकारच्या दडपशाही विरोधात नेटाने लढण्याचा निर्धार एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी संघर्ष समिती रायगडच्या कार्यकर्त्यांनी महाबळेश्वर येथे केला आहे. समितीच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या लढ्यात सक्रीय सहभागी होण्याची विनंती करण्यासाठी माजी न्यायमूर्ती बी.जी.कोळसेपाटील यांची भेट घेऊन त्यांना साकडे घातले आहे. त्यावर न्यायमूर्ती बी.जी. कोळसेपाटील यांनी सरकारला तिसरी मुंबईचा प्रकल्प आमच्या मढ्यावरच उभारावा लागेल अशा शब्दात आंदोलन कर्त्या कार्यकर्त्यांना अश्वासित करून सेझच्या विरोधातील आंदोलन जसे रस्त्यावरची लढाई आणि न्यायालयिन लढाईच्या माध्यमातून आम्ही शेतकरी जिंकलो अगदी त्याच पद्धतीने हे आंदोलनही यशस्वी करण्याची ग्वाही दिली आहे. देशातील कारभार सध्या आरएसएसच्या कलांनी सुरू असून त्यांना केवळ जनतेला दोन वेळचे जेवण देऊन असेच तडफडवायचे आहे असा गंभीर आरोप देखील यावेळी न्यायमूर्तींनी केला आहे.

उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांतील शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी घेऊन त्यावर तिसरी मुंबई नामक मुख्यमंत्र्यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला प्रकल्प राबविण्याचे सरकारच्या वतीने ठरविण्यात आले आहे. त्याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना साधे विचारात देखील न घेता सरकारने हा प्रकल्प रेटून नेण्याच्या अनुषंगाने अध्यादेश देखील काढला आहे. त्या निमित्ताने साडेबावीस टक्क्यांची फसवी योजना शेतकऱ्यांपुढे गाजर म्हणून ठेवण्यात आली आहे. हे करतांना सरकारच्या वतीनेच गेली अनेक वर्षे गावठाण विस्तार न झाल्याने गावठाणबाहेर जी गावकऱ्यांनी आपल्या नैसर्गिक वाढीपोटी कुटूंब कबील्यासाठी घरे आणि व्यावसायिक आस्थापने बांधली आहेत त्याचे नक्की काय केले जाणार आहे या विषयी सरकारने कोणत्याही पा-तळीवर स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे या गावठाणाबाहेरील घरांसाठी सरकारच्या वती-ने बिल्डर धार्जिणी क्लस्टर योजना राबविली जाण्याची भिती शेतकऱ्यांमध्ये आहे. त्याच बरोबर २०१३ चा भूसंपादन कायदा अस्तित्वात असतानाही सरकार केवळ शेतकऱ्यांना फसवण्यासाठीच साडेबावीस टक्क्यांची योजना पुढे करीत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कालच्या मंगळवारी एमएम आरडीए केएससी नवनगर विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सरचिटणीस रूपेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली चंद्रशेखर ठाकूर, प्रसिद्धी प्रमुख ज्येष्ठ पत्रकार अजित पाटील निलेश पाटील आणि अनंत पाटील यांनी माजी न्यायमूर्ती बी.जी.कोळसेपाटील यांची महाबळेश्वर येथे खास भेट घेऊन त्यांच्या कानावर आंदोलनाची रूपरेषा घातली आहे. त्यावेळी बोलतांना न्यायमूर्तींनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे समितीला आश्वासित केले असून येत्या जूनच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या शेतकरी मेळाव्याला संबोधण्यासाठी स्वतः उपस्थित राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# किल्ले रायगडावर गाढवांमुळे पर्यटक त्रस्त

**। महाड । प्रतिनिधी ।**

किल्ले रायगडावर सुरू असलेल्या संवर्धनाच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या गाढवांना त्यांच्या मालकांकडून मुख्य रस्त्यालगत बांधून ठेवले जात असल्याने पर्यटक व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गडावर बांधकाम साहित्य वाहून नेण्यासाठी या गाढवांचा वापर केला जात असला तरी त्यांची योग्य व्यवस्था नसल्याची तक्रार समोर येत आहे.

रस्त्याच्या कडेला बांधून ठेवलेल्या गाढवांमुळे पर्यटकांना ये-जा करताना अडथळे निर्माण होत आहेत. काही ठिकाणी दुर्गंधी, घाण तसेच रस्त्यावर पडणारा शेण यामुळे परिसराचे सौंदर्यही खराब होत असल्याची नाराजी पर्यटकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक रायगडावर येत असल्याने ही समस्या अधिक गंभीर बनत आहे.

दुसरीकडे, तीव्र उन्हामध्ये या गाढवांना तासनतास उभे ठेवले जात असल्याने प्राणीप्रेमींनीही चिंता व्यक्त केली आहे. पाणी व सावलीची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे जनावरांना त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. संबंधित विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन गाढवांसाठी स्वतंत्र निवारा व योग्य व्यवस्था करावी, तसेच पर्यटकांना त्रास होणार नाही.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भिसे, ता. रोहा, जि. रायगड, गट नं. १११, क्षेत्र ०.७०.८०, आकार १७.७५ हि मिळकत श्री. गणेश सखाराम कुथे यांच्या नावे व मालकीची तसेच ताबेकब्जात असलेली मौजे भिसे, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्यांच्याकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे. व त्या संबंधी उभयतांत वाटाघाटी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भिसे | १११ | ०-७०-८० | १७.७५ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकारी असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र तरी, देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २०/०५/२०२६

**ॲड. विराज वसंत पाटील**
रा.चिंचोटी, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ७२७६७३७६२१

# अनधिकृत नळजोडणीप्रकरणी ग्रामपंचायतींवर कारवाईची मागणी

## • नवी मुंबई महापालिकेचे जिल्हा परिषदेला पत्र

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे मुख्य जलवाहिनीवर अनधिकृत नळजोडणी केल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे विंधणे व देवद ग्रामपंचायतींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नवी मुंबई महापालिकेने रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भात आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठविण्यात आले.

महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मोरबे धरणातून नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या २०५० मि.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर विंधणे आणि देवद ग्रामपंचायतींकडून सुमारे १०० मि.मी. व्यासाची संयुक्त अनधिकृत नळजोडणी करण्यात आली होती. याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असता अनधिकृत जोडणी आढळून आली.

महापालिकेकडून २१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री कारवाई करत ही अनधिकृत नळजोडणी तोडण्यात आली होती. यावेळी खांदेश्वर पोलीस ठाण्यातही अहवाल सादर करण्यात आला होता. तसेच संबंधित ग्राम पंचायतींना जलचोरीप्रकरणी दंडात्मक शुल्क आकारण्यात आले असून, सुमारे ६० लाख रुपयांहून अधिक रकमेची मागणी करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, वारंवार सूचना देऊनही संबंधित ग्रामपंचायतींकडून दंडाची रक्कम भरली गेलेली नाही. एवढेच नव्हे तर १ मे २०२६ रोजी पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत नळजोडणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेने पुन्हा पोलीस बंदोबस्तात कारवाई करून जोडणी खंडित केली.

दरम्यान, संबंधित ग्राम पंचायतींकडून अद्यापही पिण्याच्या पाण्याचा वापर सुरू असल्याचा आरोप महापालिकेने केला आहे. त्यामुळे विंधणे आणि देवद ग्रामपंचायतींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या प्रकारामुळे मोरबे जलवाहिनी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



# मंदिरात चोरी

**पनवेल :** पनवेल जवळील आर-२ या ठिकाणी असलेल्या हनुमान मंदिरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून दान पेटीतील रोख रक्कम तसेच एक समई चोरुन नेल्याची घटना घडली आहे. पनवेल जवळील चिंचपाडा तलावाजवळ सेक्टर आर-२ येथे हनुमान मंदिर असून या ठिकाणी अज्ञात चोरट्याने प्रवेश करून मंदिरातील दानपेटी फोडून तेथे जमा असलेली रोख रक्कम त्याचप्रमाणे समई चोरुन नेली आहे. याबाबतची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आली आहे.

# व्यसनमुक्त खोपोलीसाठी पानटपरी चालकांची साथ

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील नागरिक आणि विशेष करून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकू नये, आरोग्यदायी समाज घडावा आणि अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होऊ नयेत या सामाजिक जाणीवेतून खोपोली पोलीस स्टेशनने शहरातील पानटपरी चालकांची विशेष बैठक घेतली. यावेळी प्रभारी पोलीस अधिकारी सचिन हिरे यांनी गुटखा, ई-सिगारेट, व्हेप, हुक्का, फुलचंद पान तसेच प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री टाळण्याचे आवाहन केले.

बैठकीत त्यांनी युवक आणि विद्यार्थी वर्गामध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त केली. क्षणिक नफ्यासाठी विकल्या जाणाऱ्या पदार्थांमुळे अनेक कुटुंबांवर आरोग्य आणि आर्थिक संकट ओढवत असल्याचे सांगत, कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे वाढते प्रमाण ही समाजासाठी धोक्याची घंटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शासनाने बंदी घातलेल्या पदार्थांची विक्री करताना कोणीही आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची स्पष्ट जाणीव करून देतानाच ही कारवाई केवळ दंडात्मक नसून समाजहितासाठीची पूर्वसूचना असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरातील प्रत्येक व्यावसायिकाने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

विशेष म्हणजे, या बैठकीत उपस्थित सर्व पानटपरी धारकांनीही सकारात्मक प्रतिसाद देत प्रतिबंधित पदार्थांची विक्री टाळण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका मांडली.

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,**
**केंद्र कार्यालय अलिबाग**
**निविदा सूचना**

आपल्या बँकेच्या चोंढी शाखेच टेरेसवर अंदाजे २६०० चौरसफुट व चौक शाखांच्या टेरेसवर अंदाजे २५०० चौरसफुट पत्रा शेडचे काम करणेचे आहे.

त्याकरिता सदर स्वरुपाची कामे लागणारे माल मटेरियलसह खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २९-०५-२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची, कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक :- २१-०५-२०२६

**सही/-**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

# धमकी देणाऱ्या एकावर गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लग्नास नकार कळवल्यानंतरही तरुणीचा पाठलाग करून धमकी दिल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही २६ वर्षीय असून, आरोपी तरूणाला तिने लग्नास नकार कळवला होता. त्यानंतरदेखील तो तरूणीला वारंवार कॉल करून मानसिक त्रास देत धमकी देत होता. तसेच, दुसऱ्या एका व्यक्तीने पीडित तरुणीच्या भावाला देखील लग्नास नकार का दिला, अशी धमकी दिली होती. त्यामुळे याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात तरुणीने तक्रार दाखल केल्याने गुन्हा दाखल केला आहे.

# पत्नीने यकृत दान करून पतीला दिले जीवनदान

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

आजच्या काळात पती-पत्नीमधील वाद, दुरावा आणि घटस्फोटाच्या घटना वाढताना दिसत असताना, नेरुळ येथील जनाबाई तांडेल यांनी आपल्या पतीसाठी केलेल्या त्यागाने समाजासमोर प्रेम, विश्वास आणि समर्पणाचा वेगळाच आदर्श उभा केला आहे.

गंभीर यकृत विकाराने मृत्यूशी झुंज देत असलेल्या पती मुकेश तांडेल यांना वाचवण्यासाठी त्यांनी स्वतःच्या यकृताचा भाग दान करून अक्षरशः नवजीवन दिले.



वाशी येथील न्यूईरा हॉस्पिटल येथे अत्यंत गुंतागुंतीची लिव्हर ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. अनेक महिन्यांपासून आजाराने त्रस्त असलेल्या मुकेश तांडेल यांनी जगण्याची आशाच सोडली होती. मात्र पत्नी जनाबाई यांनी कोणतीही भीती न बाळगता मोठ्या धाडसाने यकृत दानाचा निर्णय घेतला. डॉ. अनुराग श्रीमाल आणि डॉ. रोहन चौधरी यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांच्या टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. उपचारानंतर मुकेश तांडेल यांची प्रकृती सुधारली असून ते आता पूर्ववत आयुष्याकडे परतत आहेत.

# पान १ वरून

## वन जमीन संकटात

कोणत्याही वन कायद्यात नाही. यातील अतिशय गंभीर बाब म्हणजे वन विभागाचे अधिकारी देखील यामध्ये सामील असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वन जमिनींचे संरक्षण करणे हे वन अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य आहे. परंतु हे सर्व त्यांच्या डोळ्यासमोर होत असून ते मात्र निद्रावस्थेत आहेत. पनवेल तालुक्यातील जमिनी संदर्भात उपवन संरक्षक रायगड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सन २०२४ मध्ये अपील दाखल करून बघ्याची भूमिका घेतली आहे.

याप्रकरणी आदिवासी आदिम सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी महसूल मंत्र्यांकडे तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत चौकशी करून पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. राहुल मुंडके यांनी आदिवासी जमीन जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता अवैधरित्या हस्तांतरित केलेल्या प्रकरणाची चौकशी करून सदरहू अहवाल कोकण विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर केलेला आहे. त्यामुळे राहुल मुंडके यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

## डॉक्टरसह दोघेजण एसीबीच्या जाळ्यात

तसेच समिर म्हात्रे हे जनरेटर ऑपरेटर म्हणून कार्यरत होते. त्यांच्याकडे स्वच्छता अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला होता. या समितीमध्ये तक्रारदार हे ठेकेदार म्हणून काम करतात.ऑक्टोबर ते एप्रिल या दरम्यान बाजार समितीमधील वार्षिक देखभालसह इतर कामांचा ठेका तक्रारदार यांना मिळाला. या कामाचा कार्यादेश काढण्यात आला होता. त्यावेळी दिपक आवटे आणि समीर म्हात्रे यांनी तक्रारदार अर्थात ठेकेदार याच्याकडे कामाच्या एका वर्षाच्या होणाऱ्या बिलावर जीएसटी वगळून १५ टक्के प्रमाणे एक लाख ४६ रुपयांची लाच मागितली. तडजोडीनंतर १ लाख ४० हजार रुपये देण्याचे ठरले. या प्रकाराबाबत तक्रारादर अर्थात ठेकेदार यांनी नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून पडताळणी केली. त्यानंतर सापळा रचला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात केबीनमध्ये एक लाख ४० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांविरोधात एपीएमसी पोलीस ठाणे नवी मुंबईमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## औषध विक्रेते संपावर

असल्यामुळे छोट्या औषध विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप संघटनांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भातील धोरणांचा पुनर्विचार करावा आणि संबंधित अधिसूचना रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनांनी दिला आहे. रुग्णांना होणाऱ्या संभाव्य गैरसोयीबद्दल संघटनांनी दिलगीर व्यक्त करत असतानाच, औषध व्यवसाय आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी हे आंदोलन आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

## वाशीत १.२६ कोटींचे कोकेन जप्त

मिळालेल्या माहितीच्या आधारे ही मोठी कारवाई करण्यात आली.

वाशीतील जुहुगाव परिसरात काही नायजेरीयन नागरिक अंमली पदार्थांचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी चार ठिकाणी एकाच वेळी कोम्बिंग ऑपरेशन राबवले. या कारवाईदरम्यान वाशी सेक्टर-११ मधील हरियाली निवास येथील एका फ्लॅटमध्ये झडती घेण्यात आली.

झडतीत २५२.५ ग्रॅम वजनाचा कोकेनचा साठा, किंमत सुमारे १ कोटी २६ लाख २५ हजार रुपये, तसेच १२ मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या प्रकरणात ऑलिव्हर ओकेचुक्कू उगवु या नायजेरीयन नागरिकासह मादुयाबुकी कॉसमॉस इज्वेओमा आणि इनोसंट डाडा लाविआन्स या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## मंडळ अधिकारी लाच घेताना अटक

या कारवाईनंतर पनवेलमधील नागरिकांमधून आणि राजकीय वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताशिवाय कनिष्ठ कर्मचारी किंवा मंडळ अधिकारी एवढ्या मोठ्या प्रमाणावर लाच घेण्याचे धाडस करू शकत नाहीत, असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी गोवर्धन माने हा नक्की कोणासाठी पैसे गोळा करत होता? हा मुख्य प्रश्न उपस्थित होत आहे. गोवर्धन माने हा केवळ एक मकलेक्टरफ (पैसे गोळा करणारा दुवा) असून या लाचेच्या पैशांमधील हिस्सा वरिष्ठ तहसीलदारांना की अन्य कोणत्या बड्या अधिकाऱ्याला जाणार होता, याची निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

पनवेल तहसील कार्यालयात यापूर्वीही लाचखोरीची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. सर्वसामान्य नागरिकांना सातबारा, जमिनीच्या नोंदी आणि इतर दाखल्यांसाठी महिनोनमहिने चकरा माराव्या लागतात. कामे वेळेत करून घेण्यासाठी अशा प्रकारे लाचेची मागणी केली जाते. लाचलूचपत विभागाने आता केवळ माने याच्या अटकेवर न थांबता, या रॅकेटच्या मुळाशी जाऊन मागील सर्व व्यवहारांची आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे आणि अप्पर पोलीस अधीक्षक सुहास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तर रायगड-अलिबाग एसीबीच्या पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या नेतृत्वाखालील सापळा पथकातील सहाय्यक फौजदार विनोद जाधव, पोलीस हवालदार महेश पाटील आणि पोलीस शिपाई नवदित नांदगांवकर यांनी ही कामगिरी बजावली.

## वालोपे येथे भीषण अपघात

अपघाताचा आवाज ऐकताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

या अपघाताची माहिती मिळताच चिपळूण येथील गव्हर्नमेंट रेस्ट हाऊसजवळ कार्यरत असलेल्या रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थेची रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. स्वयंसेवक आणि स्थानिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर जखमींना प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी लाईफ केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. काही वेळाने पोलिसांनी घटनास्थळी जावून मदतकार्य केले. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरुळीत करुन महामार्ग मोकळा केला. या भीषण अपघातात संजय जाधव (रा. मार्कंडी) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह पुढील वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी कामथे सरकारी रुग्णालयात हलविण्यात आला. अपघातातील जखमींमध्ये अप्रिन सावंत (वय ४४, मुंबई), रीधा मोडक (वय २८, मुंबई), उजेर मुल्ला (वय ९, चिपळूण), रिया मुल्ला (वय ३६, चिपळूण) आणि आईल मुल्ला (वय ४, चिपळूण) यांचा समावेश आहे. सर्व जखमींवर सध्या उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. अपघातग्रस्त वाहन बाहेर काढण्यासाठी आणि बचावकार्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून वाहनचालकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खारपाडा टोलमाफीचा ‘गाजावाजा’ फुसका

खरी माहिती समोर आली. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले की, ही सूट सर्व एमएच-०६ किंवा एमएच-४६ वाहनांसाठी नसून पेण शहराच्या आसपास २० किलोमीटर परिघात राहणाऱ्या स्थानिक वाहनधारकांसाठीच लागू करण्यात आली आहे. म्हणजेच फक्त वाहनाचा नंबर एमएच-०६ किंवा एमएच-४६ असल्यामुळे टोलमाफी मिळणार नसून संबंधित वाहनधारक हा निर्धारित स्थानिक परिघात राहत असल्याचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सोशल मीडियावर करण्यात आलेला सर्व वाहनांना टोलमाफी हा दावा पूर्णपणे दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती न घेता काही राजकीय मंडळींनी स्वतःचे श्रेय घेण्यासाठी सोशल मीडियावर मोठमोठ्या पोस्ट टाकत जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप आता नागरिकांकडून होत आहे. सामान्य नागरिकांच्या भावनांशी खेळत खोटा गाजावाजा करून स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. या ग्राउंड रिपोर्टमुळे आता खारपाडा टोलबाबतचे वास्तव सर्वसामान्यांसमोर आले असून, सोशल मीडियावरील दाव्यांपेक्षा प्रत्यक्ष परिस्थिती किती वेगळी असते हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## कंटेनरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

वळणावर बंद स्थितीत उभ्या असलेल्या कंटेनरचा त्याला अंदाज आला नाही. त्यामुळे आकाश दुचाकीसह सदर कंटेनरवर धडकला. या अपघातात आकाश गंभीर जखमी झाल्याने त्याचा काही वेळात मृत्यू झाला. या अपघातानंतर कंटेनर चालक इंद्रेशकुमार लालधर (४६) याने जखमी तरुणाला कोणतीही वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न केला नाही, तसेच अपघाताची माहिती पोलिसांना न देता तो घटनास्थळावरून पळून गेला. त्याचा शोध सुरू आहे.

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग**
**निविदा सूचना**

बँकेच्या केंद्र कार्यालय ४०० केव्हीए जनरेटरसेट मेन एलटी पॅनल व ॲटो एएमएफ पॅनल एसीबीसह खरेदी करणेचा आहे.

तरी या क्षेत्रांतील व्यवसायिक यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत. वरील बँकेच्या केंद्र कार्यालय ४०० केव्हीए जनरेटरसेट मेन एलटी पॅनल व ॲटो एएमएफ पॅनल एसीबीसह खरेदीची निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २१-०५-२०२६ ते २९-०५-२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक :- २१-०५-२०२६

**सही/-**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत तसेच त्यामध्ये असणारी ग्रामपंचायत नागाव बांधकाम मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | २१४१/१/२ | बागायत ०-०५-३० | ०.१६ |

वर वर्णन केलेली बागायत जमीन मिळकत तसेच त्यामध्ये असणारी ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र. २६३७ हि बांधकाम मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक देवेंद्र यशवंत मंचेकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक २०/०५/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राह्मण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

# जेएनपीटी बंदरात अडकला कागद

## वृत्तपत्र, छपाई व्यवसाय अडचणीत




| चिरनेर | प्रतिनिधी |

**मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती आता कमी अधिक प्रमाणात नियंत्रणात आली असल्याने उरण तालुक्यातील जेएनपीटी बंदरात परदेशातुन राज्यातील वृत्तपत्रांसाठी लागणाऱ्या कागदांचे आयात करण्यात आलेले आहे. मात्र, मागील १४ दिवसांपासून सुमारे ४ हजार कंटेनर जेएनपीटी बंदरात अडकून पडले आहेत. या अडकलेल्या कंटेनरमध्ये ४६० कोटी किंमतीचा १ लाख टन कागद आहे. त्यामुळे राज्यातील वृत्तपत्र व छपाई व्यवसाय अडचणीत सापडला आहे. जेएनपीए अधिकाऱ्यांनी याला दुजोरा दिला असून, वाहनचालकांच्या तुटवड्यामुळे ही वेळ आली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.**

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती आता कमी अधिक प्रमाणात नियंत्रणात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विविध छपाई कंपन्यांच्या माध्यमातून परदेशातुन वृत्तपत्र छपाईसाठी रशिया, कॅनडा, सिंगापूर, मलेशिया, आफ्रिका, युरोपातुन कागद आयात करण्यात आलेला आहे. मात्र, कोट्यवधींचा छपाईचा कागद जेएनपीए बंदरात मागील १४ दिवसांपासून अडकून पडलेला आहे. जेएनपीए अंतर्गत बंदरातील कंटेनर वाहतूक करणारी यंत्रणा कोलमडल्यानेच ही वेळ येऊन ठेपली आहे. त्यामुळे मात्र राज्यातील वृत्तपत्र छपाई करणाऱ्या कंपन्या अडचणीत सापडलेल्या आहेत.

जेएनपीटी बंदरातील विविध सीआयएफएसमध्ये काम करणारे सुमारे २ हजार कंटेनर ट्रेलरवरील वाहनचालक दोन महिन्यांपासून पश्चिम बंगाल, युपी, बिहार निवडणुकीच्या कामासाठी राज्यात गेले आहेत. वाहनचालकांना निवडणुकीनंतर माघारी येण्यास विलंब होत चालला आहे. या विलंबामुळे कागदाचे आयात करण्यात आलेले सुमारे ४ हजार कंटेनर अडकून पडले असल्याची कबुली जेएनपीएचे कंटेनर वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी गिरीश थॉमस यांनी यांनी दिली आहे. जेएनपीएने अडकून पडलेले कागदी मालाचे आयात कंटेनर बंदराबाहेर काढण्यासाठी तुर्तास अतिरिक्त वाहनचालकांची व्यवस्था केली आहे. येत्या २५ मे पर्यंत वृत्तपत्र कागदाचे कंटेनर बंदराबाहेर काढण्यासाठी सर्वोतोपरी प्राधान्य दिले जाणार असल्याचेही थॉमस यांनी सांगितले.

> “जेएनपीए बंदरात परदेशातुन विविध कंपन्यांच्या माध्यमातून वृत्तपत्र छपाईसाठी आयात करण्यात आलेले सुमारे ४ हजार कंटेनर मागील १४ दिवसांपासून अडकून पडले आहेत. या कंटेनरमधुन १ लाख टन आणि ४६० कोटी किंमतीचा कागद बंदरात अडकून पडलेला आहे. अडकलेले कंटेनर बंदराबाहेर काढून विविध सीआयएफएसमध्ये पाठविण्यासाठी बंदर प्रशासनाला साकडे घातले आहे. मात्र, कंटेनर बाहेर काढण्याचे काम अद्यापही संथगतीने सुरू आहे. त्यामुळे वृत्तपत्र व छपाई व्यवसाय अडचणीत सापडला आहे.”
>
> –कैलास आवटे, ऑपरेशन हेड, टायटॅनिक ओशिएन सर्व्हिसेस

# निवडक




## एएम/एनएस इंडियात कामगाराचा मृत्यू

**वावोशी :** खालापूर तालुक्यातील खिरकिंडी येथे असलेल्या एएम/एनएस इंडिया कंपनीत काम करीत असताना एका कामगाराचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. संबंधित कामगारास वेळेत उपचार न मिळाल्याचा आरोप होताच काही काळ कंपनी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलिसांनी तात्काळ कंपनी परिसरात धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, कामगाराच्या मृत्यूनंतर कंपनी परिसरासह आजूबाजूच्या गावांत विविध चर्चांना उधाण आले होते. काहींनी संबंधित कामगाराचा मृत्यू महाकाय लोखंडी कॉईल अंगावर पडल्याने झाल्याची माहिती पसरविल्याने कामगार वर्गात संतापाची लाट उसळली होती. त्यामुळे अनेक कामगार कंपनीच्या गेटवर जमा होत प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करू लागले होते. दरम्यान, शवविच्छेदन अहवालानुसार संबंधित कामगाराचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर खालापूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी दिली.



## खारघर पोलिसांकडुन मुद्देमाल परत

**पनवेल :** खारघरमध्ये शस्त्राचा धाक दाखवुन जबरी चोरी करुन सोन्याच्या दागिन्यांची लुट, बनावट चावीचा वापर करुन घरातील लाखो रुपये रोख रक्कम चोरी, तसेच मोबाईल फोन चोरी आणि हरवलेले मोबाईल फोन असा लाखो रुपये किंमतीचा मुद्देमाल खारघर पोलीसांकडुन तंत्रशुध्द तपास करुन हस्तगत करण्यात आलो आहे. महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, सांगलीसह राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, झारखंड इत्यादी राज्यांमधुन सातत्याने पाठपुरावा करुन सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन हस्तगत केलेले आहेत. खारघर येथील प्रतिष्ठीत व्यक्तीला चाकुने वार करुन त्याचे एकुण ५७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लुटले होते. या गुन्ह्यामध्ये एकुण ७ आरोपी अटक करुन त्यांच्याकडुन दागिने सांगली जिल्ह्यातुन हस्तगत केले आहेत. येथील एका घराचा दरवाजा बनावट चावीने उघडुन घरातील एकुण २७ लाख रुपये रोख रक्कम चोरी केली होती. या गुन्ह्यामध्ये २ आरोपी अटक करुन त्याच्याकडुन गुन्ह्यात चोरी केलेले पुर्ण २७ लाख रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे खारघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सन २०२५ व सन २०२६ मध्ये हरवलेले तसेच चोरीस गेलेले मोबाईल फोन तांत्रिकदृष्ट्या शोध घेऊन महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये शोध घेऊन एकुण १० लाख ७४ हजार रुपये किंमतीचे एकुण ५० मोबाईल फोन हस्तगत केलेले आहेत. एकंदरीत खारघर पोलीसांकडुन गुन्ह्यांमधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व हरवलेले मोबाईल फोन असा एकुण ९४ लाख ७४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन हा मुद्देमाल त्यांच्या मुळ मालकांना परत करण्यात आला आहे.

## उभ्या कंटेनरला दुचाकीची धडक

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील बारवाई पुलाजवळ एका कंटेनर चालकाने वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत, कोणताही पूर्वइशारा किंवा पार्किंग सिग्नल न देता आपला कंटेनर धोकादायक वळणावर उभा केला. त्यामुळे या कंटेनरवर धडकून एका दुचाकी चालकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणातील फरार कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव आकारा दादु पवार (२३) असे असून, तो खालापूर तालुक्यातील नढाळ येथील रहिवासी आहे. आकाश आपल्या दुचाकीवरून पनवेल तालुक्यातील बारवाई पुलाजवळुन जात असताना, येथील डाव्या बाजूच्या वळणावर बंद स्थितीत उभ्या असलेल्या कंटेनरचा त्याला अंदाज आला नाही. त्यामुळे आकाश दुचाकीसह या कंटेनरवर धडकला. या अपघातात आकाश गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर कंटेनर चालक इंद्रेशकुमार लालधर (४६) याने जखमी तरुणाला कोणतीही वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न केला नाही, तसेच अपघाताची माहिती पोलिसांना न देता तो घटनास्थळावरून पळून गेला.

# अमरधाम स्मशानभूमीत बसणार टाकी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने नातेवाईकांना चक्क बाहेरून पाण्याच्या बाटल्या विकत आणून अंतिम विधी करावा लागल्याची धक्कादायक घटना घडली. या ढिसाळ कारभारामुळे मृतकांच्या नातेवाईकांसह स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, पालिकेकडून २ हजार लिटरची टाकी बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत एकाच वेळी दोन मृतदेह अंत्यसंस्कारासाठी आले होते; मात्र, तिथे पाणीच नव्हते. नातेवाईकांनी तात्काळ पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाशी आणि टँकरसाठी संपर्क साधला, परंतु वेळेत टँकरही उपलब्ध होऊ शकला नाही. अखेर नाईलाजास्तव नातेवाईकांनी बाहेरून पाण्याच्या बाटल्या आणून विधी पूर्ण केला. या घटनेनंतर नागरिकांनी पालिकेवर जोरदार टीका केली. यावर स्पष्टीकरण देताना ठेकेदाराच्या कर्मचाऱ्याने आधी पाच मृतदेह आल्यामुळे ५०० लिटर पाणी संपले, असे कारण पुढे केले होते. मात्र, हे कारण चुकीचे असल्याचे सांगत पालिकेने ते फेटाळून लावले. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी पाण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेबाबत ठेकेदाराने आणि त्याच्या कर्मचाऱ्यांनी आधीच जागृत राहायला हवे होते, असे सांगत पालिकेने संबंधित ठेकेदाराला कडक सूचना दिल्या आहेत. दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, येथील ५०० लिटरची जुनी टाकी हटवून आता २००० लिटर क्षमतेची नवीन टाकी बसवण्याचा निर्णय घेतला आहे. ही टाकी भविष्यात पुरेशी राहील आणि नागरिकांची गैरसोय टळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर पोलीस ठाणे परिसरातील बस डेपोच्या बाहेरील बाजुस असलेल्या उड्डाणपुलाखाली एका तरूणाचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीचे अंदाजे वय ३५ वर्षे असून, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली मिशीचे केस काळे वाढलेले आहेत. या व्यक्तिबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिहू विभागातील नागरिक त्रस्त

| शिहू | प्रतिनिधी |

शिहू विभाग परिसरात सद्या वीज वारंवार खंडीत होण्याचे प्रमाण वाढले असून, एकदा का वीज पुरवठा खंडीत झाला की, तो परत येण्यास अनेक तास वाट पाहावी लागत आहे. मध्यरात्री, पहाटे, दुपारी आशा कोणत्याही वेळेला वीजपुरवठा खंडीत होत असल्यामुळे नागरिक पुरते त्रस्त झाले असून, त्यांच्यातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

कधी तांत्रिक बिघाड तर कधी देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली दिवसभर अनेक तास वीजपुरवठा बंद करण्यात येतो. रात्री अपरात्री वीजपुरवठा वारंवार खंडीत होतो. विशेष म्हणजे वारा अथवा पाऊस नसतानाही वीज गुल होत आहे. सद्या उष्णतेची लाट सर्वत्र असून त्यात भरीसभर वारंवार वीज खंडीत होते. त्याचा सामना जेष्ठ नागरिक, गरोदर महिला व लहान मुलांना करावा लागत आहे. महावितरणाच्या या गलथान कारभाराने जणू काही शिहू विभागात अघोषित लोडशेडींग करण्यात येत असल्याचा प्रत्यय नागरिकांना येत आहे. मागील काही दिवसांपासून तर विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे या सारखे प्रकार नेहमीचेच झाले आहेत. वीज देयक वेळेत न भरल्यास उपस्थित होणारे महावितरणचे अधिकारी ग्राहकांच्या संपर्काला प्रतिसाद का देत नाहीत, असा सवाल नागरिकांकडून होत आहे.

# नवीन टाक्या उभारण्याची मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महापालिका क्षेत्रात बाढत्या पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, जलसाठा क्षमतेच्या अभावामुळे परिस्थिती गंभीर होत असल्याचा मुद्दा पुढे आला आहे. या पाश्वभूमीवर सिडकोने जुन्या जलकुंभांच्या जागी आधुनिक भूमिगत टाक्या उभाराव्यात, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे पनवेल जिल्हाप्रमुख दीपक निकम यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. सध्या सिडको महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई महापालिका, एमआयडीसी आणि हेटवणे पाणीपुरवठा योजनेवर अवलंबून आहे. मात्र, वाढती मागणी आणि मर्यादित पुरवठा यामध्ये मोठी तफावत निर्माण झाल्याने अनेक भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा, अनियमित वेळा आणि टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये साकारतंय ‘हिरकणी’ रुग्णालय

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या स्वमालकीचे पहिले बहुविशेषज्ञ रुग्णालय ठरणाऱ्या ‘हिरकणी माता बालसंगोपन’ रुग्णालयाच्या बांधकामाला अखेर प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. सुमारे १५३ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात येणारे हे ४०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय जून २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पनवेलकरांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.




- **१५३ कोटी खर्चातून उभारणी**
- **२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन**

नवीन पनवेलमधील सेक्टर १८ येथील प्लॉट क्रमांक ८–अ आणि ८–ब या भूखंडावर दहा मजली रुग्णालय उभारले जात आहे. मे. आर.आर. तुळशी बिल्डर्स प्रा.लि. या कंपनीला दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. मात्र, पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने प्रत्यक्ष काम दि.१८ एप्रिलनंतर सुरू झाले. सध्या भूखंडावर खोदकामाचे काम सुरू आहे. सुमारे साडेसात हजार चौरस मीटर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या रुग्णालयात १०० आयसीयू खाटा, ४५ एनआयसीयू खाटा, एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स–रे, मेमोग्राफी, सोनोग्राफी तसेच प्रसूतीसाठी स्वतंत्र शस्त्रक्रिया कक्ष अशी आधुनिक सुविधा उपलब्ध असणार आहे. याशिवाय १३६ चारचाकी आणि ४५१ दुचाकींसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या दहा लाखांच्या पुढे गेल्याचा अंदाज असताना महापालिकेचे स्वतःचे रुग्णालय नसल्याची उणीव या प्रकल्पामुळे भरून निघणार आहे. रुग्णालयाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराकडून प्रत्येक तीन महिन्यांचा कामाचा आराखडा मागविण्यात आला आहे, अशी माहिती पनवेल महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी दिली.

## रिलायन्समधून तुपाच्या पिशव्या लंपास

| पनवेल | प्रतिनिधी |

ओरियन मॉलमधील रिलायन्स स्मार्ट बाजारातून तुपाच्या तब्बल १०४ पिशव्या चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चार महिलांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिलायन्स स्मार्ट बाजारात काम करणारे मुकुल बिस्ट यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यानुसार, डायनामिक्स, अमूल, गोवर्धन आणि इतर कंपनीच्या तुपाच्या एकूण १०४ पिशव्या चोरीला गेल्या असून, त्यांची किंमत ५३ हजार ७११ रुपये आहे. सीसीटीव्हीच्या आधारे पोलीस शोध घेत आहेत.

# रातवड विद्यार्थ्यांची ‘सोलार पॉवर’

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ‘‘विकसित भारत बिल्डाथॉन २०२५’’ अंतर्गत विज्ञान विषयक अभिनव कल्पनेचे सादरीकरण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांच्या डॉ. जयंत नारळीकर गटाची रायगड जिल्ह्यातून राज्यस्तरासाठी निवड झाली असून, शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या गटामध्ये पार्थ सुतार, सृष्टी पवार, आस्था कोंडे, सिद्धी ऐत आणि निधी फराडे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या उपयोगासाठी कमी खर्चातील ‘‘सोलार पॉवर अम्ब्रेला’’ हा अभिनव प्रकल्प सादर केला.



विद्यार्थ्यांनी साध्या छत्रीचे रूपांतर सौरऊर्जेवर चालणाऱ्या स्मार्ट छत्रीत केले आहे. सुरुवातीला मोबाईल चार्जिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार करण्यात आला होता. मात्र, लोकांचे अभिप्राय घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी या प्रकल्पात आणखी सुधारणा करत छोटा पंखा आणि रात्री अंधाऱ्या रस्त्यावर चालताना प्रकाश मिळावा यासाठी बल्बची सुविधाही उपलब्ध करून दिली. कमी खर्चात उपयुक्त आणि पर्यावरणपूरक सुविधा देणारा हा प्रकल्प परीक्षकांच्या पसंतीस उतरला आणि त्याची राज्यस्तरासाठी निवड झाली.

# वाघ्रणला कुत्र्यांची दहशत



| वाघ्रण | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण गावात उनाड कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून, ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे. वाघ्रण गावात सर्वत्र उनाड कुत्र्यांची संख्या भरमसाट झाली असून, संबधीत प्रशासनाने तातडीने उपाय योजना व बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ मंडळ यांच्याकडून करण्यात येत आहे.

नुकतेच वाघ्रण गावातील उनाड पिसाळलेल्या कुत्र्याने दोन दिवसांपूर्वी दोन महीलांचे जोरदार चावे घेतल्याने दोघींवर उपचार रुग्णालयात चालू आहेत. प्रगती पाटील व गुलाब पाटील अशी त्या महिलांची नावे असून, दोघीनांही पिसाळलेल्या कुत्र्याने रक्तबंबाळ केले आहे होते. या दोघींपैकी प्रगती पाटील यांचा रक्तप्रवाह जास्त झाला आहे. त्यामुळे लहान मुले, महिला आणि इतरांना घरा बाहेर पडताना जपून बाहेर पडावे लागत आहे. काही जण हातात संरक्षण म्हणून काठी घेऊनच ये–जा करताना दिसत आहेत. हे कुत्रे पाठीमागून येऊन हल्ला करतात. त्यामुळे या कुत्र्यांचा बंदोबस्त व्हावा, अशी मागणी ग्रामस्थांसह सेवाश्रम सामाजिक संस्था वाघ्रणकडून देखील करण्यात येत आहे.

**‘नाट्यप्रभा’मध्ये गजा आला रे नाटकाने दमदार सुरुवात | प्रेक्षकांकडून मिळाला भरभरुन प्रतिसाद**

# गूढ, विनोद आणि रहस्याचा भन्नाट संगम

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

ग्रामीण रंगभूमी आयोजित आणि चित्रलेखा पाटील पुरस्कृत ‘नाट्यप्रभा’ या नाट्यमहोत्सवाची दमदार सुरुवात श्री हनुमान नाट्य मंडळ भोनंग निर्मित ‘गजा आला रे’ या नाटकाने झाली. लेखक–दिग्दर्शक प्रकल्प वाणी यांनी तब्बल १८ वर्षांपूर्वी रायगडच्या रंगभूमीवर सादर केलेला हा प्रयोग पुन्हा नव्याने उभा करण्याचे धाडस भोनंगच्या ग्रामीण कलाकारांनी केले आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच. गूढ, रहस्य, चमत्कार आणि विनोद यांच्या सुरेख मिश्रणाने सजलेले हे नाटक प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवते.

मुंबईत राहणारा गजाननराव सरपोतदार विचित्र स्वप्नांनी त्रस्त झालेला असतो. त्याच्यासोबत विनोदाची किनार जपणारा मित्र संजू असतो. या स्वप्नांच्या मागचे रहस्य शोधताना गजा ‘बाबा चमत्कार’पर्यंत पोहोचतो आणि तेथून कथानकाला खऱ्या अर्थाने रंग चढू लागतो. श्रीरंगपूरच्या वाड्यात घडणाऱ्या घटना, गजाच्या स्वप्नात येणारे आत्मे आदिमानव, संत, बकुळा, मावळा हे पात्र प्रत्यक्ष रंगमंचावर अवतरतात आणि प्रेक्षकांना हसवून अक्षरशः सळो की पळो करून सोडतात. रंगराव आणि त्याचे साथीदार दगड्या–धोंड्या यांची वाडा हडप करण्याची धडपड, पैशाच्या मोहात अडकलेला गजा, तर दुसरीकडे फिल्मी अदांनी भारलेली पण गजावर मनापासून प्रेम करणारी यमी आणि या सगळ्या कथानकाचा उलगडा करणारे आबा या सर्व पात्रांचा भन्नाट विनोदी कोलाज म्हणजे ‘गजा आला रे’. नाटकाच्या शेवटी प्रेक्षकांना केवळ हसवले जात नाही, तर एक झणझणीत सामाजिक संदेशही दिला जातो. याचे संपूर्ण श्रेय लेखकाला द्यावे लागेल. संपूर्ण नाटक एकहाती पेलणारा गजा म्हणजेच शेखर झावरे याच्या अफाट एनर्जीला सलाम करावाच लागेल. त्याला समर्थ साथ देणारी सर्व कलाकार मंडळीही तितकीच ताकदीची ठरतात. विशेषतः यमीच्या भूमिकेत तन्वी पाटील हिने स्वतः चे वेगळेपण ठळकपणे सिद्ध केले आहे. एनर्जी आणि टायमिंग ही या नाटकाची खरी ताकद असून ती रंगमंचावर प्रभावीपणे उतरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रत्येक कलाकाराने केला आहे. कलाकारांच्या अभिनयाइतकीच नाटकाची तांत्रिक बाजूही प्रभावी ठरते. ग्रामीण रंगभूमीवर व्यावसायिक धाटणीचे चार भव्य सेट उभे करणे, हे खरोखरच धाडसी पाऊल म्हणावे लागेल. नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा या सर्व बाबी प्रेक्षकांना शंभर टक्के व्यावसायिक नाट्यविष्काराचा अनुभव देतात. याचे श्रेय दिग्दर्शक आणि निर्मात्यांना द्यावे लागेल.





# हात दाखवून अवलक्षण

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा अलिकडचा चीन दौरा म्हणजे हात दाखवून अवलक्षण असा प्रकार होता. चीनने या दौऱ्यासाठी ट्रम्प यांना निमंत्रण दिलेले नव्हते. ट्रम्प म्हणाले मी येतो. त्यावर चीन म्हणाला या. चीनच्या दौऱ्यात जबरदस्त चर्चा झाली, बरेच करार झाले वगैरे जाहिरात ट्रम्प यांनीच केली. पण चीनने त्यावर एक अवाक्षरही काढलेले नाही. ट्रम्पने या भेटीला ऐतिहासिक असे म्हटले. चीनच्या अधिकृत पत्रकांमध्ये तसा कुठेही उल्लेख नाही. ट्रम्प यांना चीनमध्ये जी वागणूक मिळाली तीही नमुनेदार होती. ट्रम्प यांचे स्वागत करण्यासाठी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आधीपासून हजर वगैरे नव्हते. ट्रम्प यांचा काफिला निघाल्यावर ते निघाले. व ट्रम्प येण्याच्या वेळीच नेमक्या वेळी ते दाखल झाले. ट्रम्प यांना मानवंदना देण्यासाठी जे लष्करी जवान निवडले होते त्यांची उंची ट्रम्पपेक्षा जास्त असेल याची खबरदारी घेतली गेली होती. सर्वसाधारण चिनी लोक बुटके असतात व अमेरिकी धिप्पाड. त्यामुळे एरवी हे अंतर फार प्रकर्षाने दिसले असते. पण अमेरिकेच्या तुलनेत चीन कुठेही कमी नाही हे सिध्द करण्यासाठी फार बारकाईने चीनने विचार केला होता. एका स्मारकाच्या ठिकाणी बऱ्याच पायऱ्या चढून जायचे होते. तिथे शी जिनपिंग झपाझप चढून गेले. ट्रम्प यांना अर्थातच धाप लागली. त्यामुळे मग शी जिनपिंग हे थोडा वेळ थांबले. सर्वात मोठा दणका पहिल्याच चर्चेत व मेजवानीच्या प्रसंगात चीनने दिला. तैवान प्रश्नी कोणतीही तडजोड केली जाणार नाही असा स्पष्ट इशारा जिनपिंग यांनी ट्रम्प यांना दिला. तैवानबाबत अमेरिकेने काही हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर संघर्ष अटळ आहे अशा शब्दात जिनपिंग यांनी ट्रम्प यांना बजावले. तैवान हा चीनचाच एक प्रांत आहे असे चीनचे म्हणणे आहे. तर तैवान स्वतःला स्वतंत्र देश समजतो. त्याला युरोप व अमेरिकेचा पाठिंबा आहे. त्यातल्या काही देशांनी तैवानला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यताही दिलेली आहे. त्यामुळे चीन व पाश्चात्य देशांचे वैर आहे.

## तैवानबाबत ट्रम्पचे हात वर

चीन अधूनमधून तैवानवर हल्ला करून त्याला कबजात घेण्याची धमकी देत असतो. मध्यंतरी त्याने लष्कराची हलवाहलवही केली होती. पण अमेरिकेने यात हस्तक्षेप केला तर जागतिक स्तरावरील युध्दाला तोंड फुटू शकेल याची चीनला जाणीव आहे. जपान व कोरियासारखे चीनचे जुने शत्रू यामध्ये अमेरिकेला मदत करू शकतात. चीनला अशा थेट लढायांची सवय नाही. तो भारताच्या सीमेवर कुरापती करू शकतो. पण त्याला प्रत्युत्तर दिल्यावर तो माघारी गेला. तैवान मुद्द्यावरून अमेरिका व इतर देशांनी एकाच वेळी घेरल्यास आपण एकटे पडू शकतो याची चीनला कल्पना आहे. त्यामुळेच कितीही इच्छा असली तरी तैवानवर चीनने थेट दावा करून आक्रमण वगैरे केलेले नाही. मात्र ट्रम्प यांच्या उपस्थितीत तैवानला हात घालू नका असा इशारा देण्याचे धाडस जिनपिंग यांनी दाखवावे यात अनेक अर्थ दडलेले आहेत. आजवर चीनने दबून राहिला तरी येत्या काळात तो तसा राहीलच असे हा याचा स्पष्ट संकेत आहे. सध्या सर्व जगाचे लक्ष इराण युध्दाकडे आहे. अमेरिका त्यात गळ्यापर्यंत अडकली आहे. या युध्दाला बहुसंख्य अमेरिकी लोकांचा अजिबात पाठिंबा नाही. खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षातूनच त्यांच्यावर टीका होत आहे. येत्या चार महिन्यात अमेरिकी संसदेच्या मध्यावधी निवडणुका होणार आहेत. त्यात ट्रम्प यांचा पक्ष पराभूत होईल अशी लक्षणे आहेत. त्यामुळे त्यांना आता देशाच्या बाहेर आणखी युध्दाच्या भानगडी करणे परवडणारे नाही. ट्रम्प यांच्या गोचीचा फायदा चीन पुरेपूर उचलण्याच्या तयारीत दिसतो आहे. तैवान प्रश्नी वातावरण तापवून आपला खुंटा बळकट करायचा असा यातला इरादा दिसतो. विशेष म्हणजे जिनपिंग यांचा हा आक्रमक पवित्रा ट्रम्प यांना इतका अनपेक्षित होता की त्यावर ते जोरकस प्रत्युत्तर देऊ शकले नाहीत. उलट त्यांनी तैवानला तुम्ही स्वतंत्र होण्याची स्वप्ने पाहू नका असा सल्ला दिला. दहा हजार मैलांवरून लढायला येऊ शकणार नाही असेही ते म्हणाले.

## ड्रॅगनचा दणका

यापूर्वी चीनच्या विरोधाला न जुमानता अमेरिकेने आपले मंत्री इत्यादी तैवानला पाठिंबा देण्यासाठी त्यांच्याकडे खास सरकारी भेटीवर पाठवले होते. पण ट्रम्प यांचे हे वक्तव्य म्हणजे तैवानबाबत अमेरिका हात वर करीत आहे असा संकेत देणारे होते. त्याची चर्चा सध्या चालू आहेच. अर्थात, ट्रम्प आता अमेरिकेत परत गेले आहेत. तिथे आपल्या गुहेत शिरल्यावर ते पुन्हा फुकाच्या डरकाळ्या फोडणार नाहीत याची खात्री कोणीही देऊ शकत नाही. गेल्या वीस वर्षात जगामध्ये अमेरिकेची पीछेहाट झाली असली आणि चीनची जबरदस्त वेगाने भरभराट झालेली असली तरी आजही अमेरिका जगातील सर्वात श्रीमंत आणि सामर्थ्यशाली राष्ट्र आहे यात शंका नाही. मात्र डोनाल्ड ट्रम्प नावाचा एक माथेफिरू, बेभरवशाचा नेता अध्यक्ष म्हणून निवडल्यापासून अमेरिकेची अवस्था केविलवाणी झाली आहे. ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची शपथ घेतल्याला आज बरोबर पाच महिने झाले. पण या छोट्या काळात त्यांनी जगाच्या राजकारणात जो हैदोस घातला आहे त्याला इतिहासात तोड नाही. आधी त्यांनी हरेक देशावर दणादण टॅरिफ लादला. चीनवर तर दीडशे ते पाचशे टक्के टॅरिफ लागेल अशी घोषणा केली. इतर देश बधले पण चीनने जुमानले नाही. बाकीच्या देशांचे अध्यक्ष, पंतप्रधान जातीने अमेरिकेत हजर झाले व आपापल्या देशांशी सवलती पदरात पाडून घेते झाले. पण चीनने अमेरिकेशी वाटाघाटी केल्या त्याही अमेरिकेत नव्हे तर तिसऱ्या देशाच्या शहरात म्हणजे जीनिव्हात. मधल्या काळात हे टॅरिफचे धोरण न्यायालयाने बेकायदा ठरवल्याने त्यातली हवा निघून गेली आहे. याच दरम्यान २८ फेब्रुवारीला इस्रायल व अमेरिकेने इराणवर हल्ला केला. ते युध्द अजूनही अधिकृतपणे संपलेले नाही. यातून अमेरिकेला काय हासिल झाले याचे उत्तर कोणीही देऊ शकत नाही. उलट यामुळे जगाचा इंधन पुरवठा विस्कळित झाला. खुद्द अमेरिकेतही तेल व गॅसचे दर वाढले आहेत. जगात मंदी आली तर त्याचा फटका अमेरिकी कंपन्यांना बसणार आहे. हे लक्षात घेऊन ट्रम्प आता इराणमधून माघारीची संधी शोधत आहेत. चीनला मध्यस्थी घालून इराणला माघार घ्यायला लावता येईल का हे ट्रम्प चाचपून पाहत होते. पण चीनने त्यांना धूप घातलेली नाही. दुसरीकडे मोबाईल, ईव्ही गाड्या इत्यादींमध्ये वापरली जाणाऱ्या दुर्मीळ खनिजांचा पुरवठा बंद करून चीनने यापूर्वी ट्रम्पला दणका दिला होता. त्यामुळेच त्यांना चीनवरच्या टॅरिफ लादण्याच्या धोरणाचा फेरविचार करावा लागला. आता चीनचा दौरा केल्यानंतरही पदरात तर काहीच पडले नाही, उलट चिनी ड्रॅगनने आणखी चार दणके दिले असा प्रकार झाला.

विचार

# कच्च्या तेलाच्या व्यापारावर परिणाम?

***संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) अलिकडेच पेट्रोलियम निर्यातक देशांच्या संघटनेतून म्हणजेच 'ओपेक'मधून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. पश्चिम आशियामध्ये अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर असताना 'यूएई'ने घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचा परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित राहणार नसून भारतासह जगातील अनेक देशांवर दिसू शकतो.***




'ओपेक' ही जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांची संघटना आहे. १९६० मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेचा मुख्य उद्देश जागतिक तेल उत्पादनावर नियंत्रण ठेवून किमती स्थिर ठेवणे हा आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक, कुवेत आणि व्हेनेझुएला या देशांनी मिळून तिची स्थापना केली होती. नंतर संयुक्त अरब अमिरातीसह इतर देशही त्यात सहभागी झाले. पुढे २०१६ मध्ये 'ओपेक प्लस'ची स्थापना झाली. त्यात रशियासह इतर काही देशांचाही समावेश करण्यात आला. जगातील जवळपास ३५ टक्के कच्च्या तेलाचे उत्पादन 'ओपेक' देशांकडून होते. त्यामुळे या संघटनेचे निर्णय जागतिक तेलबाजारावर थेट परिणाम करतात. अनेक दशकांपासून 'ओपेक' उत्पादन कोटा ठरवून तेलाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत आला आहे. उत्पादन कमी करून किमती वाढवणे किंवा उत्पादन वाढवून बाजार स्थिर ठेवणे ही त्यांची पारंपरिक भूमिका राहिली आहे. अशा परिस्थितीत 'यूएई'सारख्या मोठ्या तेल उत्पादक देशाने 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेणे ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. 'ओपेक'मध्ये 'यूएई' हा चौथा सर्वात मोठा तेल उत्पादक देश मानला जातो. २०२४ मध्ये 'यूएई' दररोज सुमारे २९.२ लाख पिंप तेल उत्पादन करत होता. त्यामुळे त्याच्या बाहेर पडण्यामुळे 'ओपेक'च्या एकात्मतेवर आणि प्रभावापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. 'यूएई'ने आपल्या निवेदनात म्हटले आहे, की हा निर्णय 'राष्ट्रीय हित' लक्षात घेऊन घेण्यात आला आहे. देशाच्या दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक उद्दिष्टांनुसार ऊर्जा क्षेत्रात अधिक गुंतवणूक वाढवणे आणि भविष्यातील जागतिक ऊर्जा बाजाराच्या गरजांनुसार स्वतंत्र भूमिका घेणे आवश्यक असल्याचे 'यूएई'चे मत आहे.

प्रत्यक्षात पाहता, या निर्णयामागे दोन मोठी कारणे दिसून येतात. पहिले कारण म्हणजे जागतिक तेलबाजारातील अस्थिरता आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती. अमेरिका आणि इस्रायलच्या इराणविरोधातील कारवायांमुळे होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव वाढला आहे. जगातील सुमारे २५ टक्के समुद्री तेल व्यापार आणि २० टक्के एलएनजी पुरवठा या मार्गातून होतो. त्यामुळे या मार्गावरील संकटाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होत आहे. दुसरे आणि अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे सौदी अरेबिया आणि 'यूएई'मधील वाढते मतभेद. सौदी अरेबियाला 'ओपेक'चा अनौपचारिक नेता मानले जाते. उत्पादन कोटा, तेल धोरण आणि बाजार नियंत्रण याबाबत यूएई आणि सौदी अरेबियामध्ये काही वर्षांपासून मतभेद असल्याचे बोलले जात होते. 'यूएई'ने गेल्या काही वर्षांमध्ये स्वतःची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी मोठी गुंतवणूक केली; पण 'ओपेक'च्या कोटा व्यवस्थेमुळे त्याला अपेक्षित उत्पादन करता येत नव्हते. त्यामुळे 'यूएई'ची स्वतंत्रपणे उत्पादन वाढवण्याची इच्छा होती. यामुळे आता 'यूएई' 'ओपेक'च्या उत्पादन मर्यादांपासून मुक्त होणार आहे. म्हणजेच तो बाजारातील परिस्थितीनुसार स्वतःचे तेल उत्पादन वाढवू किंवा कमी करू शकतो. विशेषतः आशियातील वाढत्या मागणीचा फायदा घेण्याचा 'यूएई'चा प्रयत्न असल्याचे दिसते. चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया हे देश ऊर्जा वापराच्या दृष्टीने वेगाने वाढत आहेत आणि 'यूएई'ला या बाजारपेठांमध्ये अधिक मजबूत उपस्थिती हवी आहे.

प्रा. जयसिंग यादव

भारतासाठी या घडामोडी विशेष महत्त्वाच्या आहेत. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. त्यातील मोठा भाग मध्यपूर्वेतून येतो. 'यूएई' हा भारताचा प्रमुख ऊर्जा भागीदार असून भारताच्या एकूण तेल आयातीत त्याचा मोठा वाटा आहे. 'यूएई'ने उत्पादन वाढवले, तर भविष्यात भारताला अधिक स्थिर आणि कदाचित स्वस्त दरात तेल मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. वाढत्या जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर उर्जेसाठी भारताकडे विविध पुरवठा स्रोत उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे; मात्र चित्र इतके सोपे नाही. कारण सध्या होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव कायम आहे. हा मार्ग पूर्ण क्षमतेने खुला होत नाही, तोपर्यंत उत्पादन वाढवले, तरी प्रत्यक्ष पुरवठा सुरळीत होईल असे नाही. 'यूएई'कडे फुजैराहसारखी पर्यायी बंदरे असली, तरी त्यांची क्षमता मर्यादित आहे. याशिवाय, या निर्णयामुळे 'ओपेक'च्या भविष्यासंदर्भातही प्रश्न निर्माण झाले आहेत. मोठे उत्पादक देश स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी संघटनेबाहेर जाण्याचा मार्ग निवडू लागल्यास 'ओपेक'ची एकत्रित ताकद कमी होऊ शकते. भविष्यात इतर देशही अशाच प्रकारचा विचार करू शकतात. ऊर्जा राजकारणाच्या दृष्टीने पाहता ही घटना जागतिक शक्ती समीकरणातील बदल दर्शवते. एकेकाळी तेलबाजारावर मोजक्या देशांचे नियंत्रण होते. आज मात्र प्रत्येक देश आपले स्वतंत्र आर्थिक हित, गुंतवणूक आणि भू-राजकीय भूमिका लक्षात घेऊन निर्णय घेत आहे.

भारतासाठी ही परिस्थिती संधी आणि आव्हान दोन्ही घेऊन येते. एका बाजूला अधिक पुरवठा आणि संभाव्य स्थिर किमतींची शक्यता आहे, तर दुसऱ्या बाजूला मध्यपूर्वेतील अस्थिरता, वाढते युद्धजन्य वातावरण आणि समुद्री मार्गांवरील धोके कायम आहेत. या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे ऊर्जा हा केवळ आर्थिक विषय राहिलेला नाही. तो आता जागतिक राजकारण, युद्ध, कूटनीती आणि राष्ट्रीय सुरक्षेचा केंद्रबिंदू बनला आहे. 'यूएई'चा 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय हे त्याचेच एक मोठे उदाहरण आहे. गेली सहा दशके तेलाच्या जागतिक किमतींवर नियंत्रण ठेवणाऱ्या एका बलाढ्य कार्टेलच्या वर्चस्वाला बसलेला हा सर्वात मोठा तडाखा आहे. संयुक्त अरब अमिरातीचा हा निर्णय अचानक घेतलेला वाटत असला तरी त्याची पाळेमुळे गेल्या काही वर्षांमधील सौदी अरेबिया आणि 'यूएई' यांच्यातील वाढत्या मतभेदांमध्ये दडली आहेत. संयुक्त अरब अमिरातीने आपल्या तेल उत्पादन क्षमतेत प्रचंड गुंतवणूक केली आहे. सध्या त्यांची क्षमता दिवसाला सुमारे ४८.५ लाख पिंप इतकी आहे; परंतु 'ओपेक'च्या नियमांमुळे त्यांना केवळ ३५-३६ लाख पिंपच उत्पादन करण्याची परवानगी होती. त्यामुळे आपल्या नैसर्गिक संसाधनांचा पूर्ण वापर करून महसूल वाढवण्याच्या अमिरातीच्या महत्त्वाकांक्षेला 'ओपेक'चे निर्बंध अडथळा ठरत होते.

संयुक्त अरब अमिरातीला २०२७ पर्यंत आपली उत्पादन क्षमता ५० लाख पिंपापर्यंत न्यायची आहे. 'तेल संपण्यापूर्वी त्याचा जास्तीत जास्त फायदा उठवणे' हे संयुक्त अरब अमिरातीचे धोरण सौदी अरेबियाच्या 'किमती स्थिर ठेवण्यासाठी उत्पादन कमी करणे' या धोरणाशी विसंगत ठरले. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये केवळ तेलावरूनच नव्हे, तर येमेनमधील सुरक्षा धोरण आणि मध्यपूर्वेतील नेतृत्वावरूनही स्पर्धा सुरू झाली आहे. संयुक्त अरब अमिरातीचा 'ओपेक' त्याग हा केवळ आर्थिक नसून एक रणनीतिक बदल आहे. गेली अनेक वर्षे 'ओपेक' म्हणजे सौदी अरेबियाची हुकूमत असे समीकरण होते. संयुक्त अमिरातीच्या बाहेर पडण्यामुळे सौदी अरेबियाचे या संघटनेतील वजन कमी झाले आहे. एका अर्थाने संयुक्त अरब अमिरातीने आपली 'धोरणात्मक स्वायत्तता' जाहीर केली आहे. 'गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी) मध्ये संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबिया हे दोन मुख्य स्तंभ आहेत. या निर्णयामुळे या देशांमधील एकीला तडा गेला असून, इराणसारख्या शत्रू देशासमोर आखाती देशांची आघाडी कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा विविधांगी अडचणींमुळे या निर्णयाची आणि त्याच्या संभाव्य परिणामांची जगभर चर्चा आहे.

चर्चा आजची

# विद्यार्थ्यांची परीक्षा घ्या 'नीट'

काही महिन्यांपूर्वी पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी नीट-पीजी परीक्षेतील गुणांच्या पात्रतेचे निकष शून्य पर्सेंटाईलपर्यंत खाली आणण्याची नामुष्की आली होती. आता त्यापाठोपाठ वैद्यकीय पदवी शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेत नीट परीक्षेचा पेपर फुटण्याची नवी नामुष्की समोर आली. त्यामुळे राष्ट्रीय प्रवेश परीक्षा मंडळाला (नीट) ही परीक्षा रद्द करावी लागली. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या देशातील सुमारे २२ लाख ७९ हजार विद्यार्थ्यांना मानसिक धक्का बसला आहे. या पेपरफुटी प्रकरणाच्या सीबीआय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांना काही धागेदोरे लागले आहेत. त्याची चौकशी होऊन निष्कर्षही पुढे येतील. परंतु, भारतासारख्या देशामध्ये शैक्षणिक दर्जाची ससेहोलपट सुरू असताना प्रवेश परीक्षेची गोपनीयता बंदिस्त राहू शकत नाही, हे अत्यंत गंभीर वास्तव पुढे आले आहे.

वैद्यकीय पदवी परीक्षेसाठी नीट ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची समजली जाते. इथेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याला कलाटणी मिळते. अलीकडे भारतात वैद्यकीय शिक्षण सर्वसामान्य गोरगरिबांच्याच काय, तर उच्च मध्यमवर्गीयांच्याही आवाक्याबाहेर गेले आहे. आरक्षणाच्या सवलतींना पात्र असलेल्या विद्यार्थ्यांखेरीज अन्य विद्यार्थ्यांसाठी तर ही अग्निपरीक्षा समजली जाते. या परीक्षेसाठी विद्यार्थी रात्रीचा दिवस करतात आणि परीक्षेला सामोरे गेल्यानंतर त्यांचा पेपर अगोदरच फुटलेला असतो. या परीक्षा पत्रिकेचे मूल्य कोटीत असते आणि जसे ग्राहक वाढतील, तसे त्याचे मूल्य कमी होते. असा पेपर फोडणारी आणि त्याची विक्री करणारी एक मोठी साखळी देशभर पसरली आहे. या साखळीचा सुगावा लागू नये, ही खरे तर अशक्य कोटीतील गोष्ट आहे. त्यामुळे नीट पेपर फुटी प्रकरणाने भ्रष्ट साखळीबरोबर, दक्षता यंत्रणा पारदर्शकता आणि विश्वासार्हता यांचे धिंडवडे उडविले आहेत. आधीच दोन वर्षे कठोर अभ्यास करून परीक्षा दिल्यानंतर आता पुन्हा तयारी करावी लागणार असल्याने विद्यार्थ्यांना मानसिक



त्रासाला सामोरे जावे लागले आहे. तसेच, अनेकांनी परदेशी आणि बाहेरगावी जाण्याचे बेत आखले होते. आता त्यांना हे बेत सोडून पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यातून यातील गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.


शिक्षणाच्या प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षा, राज्य आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निवड प्रक्रिया यामध्ये हा काही पहिला घोटाळा नाही. मध्य प्रदेशात २०१३ मध्ये व्यावसायिक परीक्षा मंडळाचा घोटाळा बाहेर आला आणि संपूर्ण देश हादरला होता. भारतातील सर्वात गाजलेला परीक्षा आणि भरती गैरव्यवहार म्हणून त्याची नोंद झाली आहे. या घोटाळ्याच्या निष्कर्षातून गेल्या १२ वर्षांत काही बोध घेतला गेला नाही. व्यापम घोटाळ्याचे उत्तरदायित्व कोणाचे होते, त्यांच्या चौकशीऐवजी त्यांना बढतीची शिडी कोणाच्या आशीर्वादाने चढावयास मिळाली आणि सध्याच्या नीट घोटाळ्याचे उत्तरदायित्व कोणाच्या गळ्यात खऱ्या अर्थाने जाते, याचा सखोल अभ्यास केला, तर पाणी कोठे मुरते, याची जागा शोधता येणे शक्य आहे. परंतु, आपल्याकडे मात्र राजकीय प्रभावाखाली असे शोधण्याचे कष्ट घेतले जात नाहीत. उलट शिक्षण व्यवस्थेला जडलेला भ्रष्टाचाराचा कॅन्सर उत्तरोत्तर पसरत गेल्याचे यंदाच्या नीट पेपरफुटी प्रकरणाने निदान करण्याची वेळ आणली आहे.

वैभव पाटील

जगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने वेगवान प्रगती केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या क्षेत्रांनी केलेल्या विस्मयकारक प्रगतीने एका नव्या युगाचा प्रवेश सुकर झाला आहे. अशावेळी देशातील महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांच्या प्रश्नपत्रिका सुरक्षित राहणार नसतील, तर हे व्यवस्थेचे सर्वात मोठे अपयश मानले गेले पाहिजे. कारण, भारतात नीट सारख्या परीक्षेला २२ ते २५ लाख विद्यार्थी प्रविष्ट होत असले, तरी चीनमध्ये प्रतिवर्षी घेतली जाणारी गाऊकाऊ या राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत स्पर्धात्मक विद्यापीठ प्रवेश परीक्षेत प्रतिवर्षी सरासरी १ कोटी ३० लाख विद्यार्थी प्रविष्ट होतात आणि तेथे पेपरफुटीसारख्या प्रकरणाला थारा मिळत नाही, याचा बोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचाही परीक्षांवर लक्ष ठेवण्यासाठी आधार घेतला जातो आणि भारतात एआय विद्वज्जनांच्या चर्चेपुरती मर्यादित आहे.

एका परीक्षेचा पेपर फुटणे ही गोष्ट लाखो गुणवान विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. त्यांच्या करिअरच्या महत्त्वाच्या टप्प्यावर अशी शिकार केली जाणार असेल, तर मग भारत हा सर्वाधिक तरुणांचा देश होईल; पण तो सर्वाधिक बुद्धिवंतांचा कसा होणार? नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीनंतर आता ही परीक्षा घेण्याच्या पद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या परीक्षेची प्रश्नपत्रिका जयपूर येथील प्रिंटिंग प्रेसमधूनच परीक्षेच्या काही दिवस आधीच फुटल्याने, आता ही परीक्षा कॉम्प्युटर बेस्ड ऑनलाइन पद्धतीने घेण्याची मागणी केली जात आहे.

लोकसंसद




## अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह

लातूर येथील आरसीसी क्लासेसचा सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर याला 'नीट' पेपरफुटी संदर्भात सीबीआयने अटक केल्यानंतर महाराष्ट्रात शैक्षणिक गुणवत्तेचा ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लातूर पॅटर्न'च्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. लातूरमधील कोचिंग क्लासेसच्या पारदर्शकतेला तडा गेल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमासह तीव्र संतापाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे 'नीट' पेपरफुटी घोटाळ्याचे धागेदोरे महाराष्ट्रभर पसरले असून या अनुषंगाने केंद्रीय अन्वेषण विभागाने नाशिक, पुणे, लातूर, नांदेड येथील काही जणांना अटक केली आहे. तसेच पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाची सूत्रे विदर्भापर्यंत पोहोचली असून नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील या घोटाळ्याशी संबंधित संशयित असलेल्या तीन विद्यार्थ्यांची झाडाझडती घेण्यात आली. ज्या महाराष्ट्राला देशातील प्रगतीशील, सुसंस्कृत, अग्रणी राज्य म्हणून ओळखले जाते आणि ज्या महाराष्ट्राला वारकरी संप्रदाय, नैतिक मूल्ये आणि संतांची महान परंपरा लाभली आहे, त्याच संतांच्या महाराष्ट्रात 'नीट' सारख्या देशव्यापी परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला काळीमा फासला गेला आहे. देशातील लाखो गरीब आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणणारे 'नीट' पेपरफुटीचे प्रकरण अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह असून सरकारने दोषींवर कठोरात कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# राजीव गांधी हत्या...एक अंतर्गत कट

१९४४ मध्ये २० ऑगस्ट रोजी जन्मलेले, राजीव गांधी भारताचे सहावे पंतप्रधान होते. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ रोजी आत्मघातकी हल्ल्यात हत्या करण्यात आली होती. त्यांनी आपल्या कार्यकाळात श्रीलंकेत शांती सेना पाठवली. त्यामुळे म्हणजेच लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम ही तमिळ बंडखोर संघटना त्यांच्यावर नाराज होती. राजीव गांधींना फुलांचा हार घालण्याच्या बहाण्याने एलटीटीईची महिला दहशतवादी धनू (तेनमोजी राजरत्नम) पुढे आली. तिने राजीव गांधींच्या पायाला स्पर्श केला आणि खाली वाकून कमरेला बांधलेल्या स्फोटकांचा स्फोट केला. हा स्फोट एवढा जोरदार होता की, अनेकांच्या चिंधड्या उडाल्या. राजीव गांधी आणि हल्लेखोर धनू यांच्यासह १६ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ४५ जण गंभीर जखमी झाले. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे नातू आणि इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र राजीव यांनी ब्रिटनमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेतले होते. १९६६ मध्ये ते व्यावसायिक पायलट झाले. राजकारणातयायचे नव्हते, म्हणून १९८० पर्यंत इंडियन एअरलाइन्सचे पायलट राहिले. त्यावेळी राजीव यांचे धाकटे बंधू संजय गांधी राजकारणात सक्रिय होते. १९८० मध्ये विमान अपघातात संजय गांधींच्या मृत्यूनंतर राजीव यांनी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी संजय गांधी यांच्या अमेठी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि जिंकली. १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला तीन चतुर्थांश जागा जिंकण्यात यश आले होते. त्यावेळी काँग्रेसने ५३३ पैकी ४१४ जागा जिंकल्या होत्या. राजीव पंतप्रधान झाले तेव्हा त्यांचे वय अवघे ४० वर्षे होते. ते देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात शाळांमध्ये संगणक बसविण्याची व्यापक योजना केली. जवाहर नवोदय विद्यालयाची स्थापना केली. गावोगावी दूरध्वनी पोहोचण्यासाठी पीसीओ उपक्रम सुरू केला. यादरम्यान त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही करण्यात आले. शीख दंगल, भोपाळ गॅस घटना, शाहबानो केस, बोफोर्स घोटाळा, काळा पैसा आणि श्रीलंका धोरणावर राजीव सरकारवर टीका झाली. त्यामुळे पुढच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि व्हीपी सिंग यांचे सरकार स्थापन झाले. हे सरकार १९९० मध्ये पडले आणि काँग्रेसच्या पाठिंब्याने चंद्रशेखर यांचे सरकार स्थापन झाले. हे सरकारही १९९१ मध्ये पडले आणि निवडणुका जाहीर झाल्या. या निवडणुकांच्या प्रचारासाठी राजीव गांधी तामिळनाडूला गेले होते. जिथे त्यांची हत्या झाली. राजीव गांधींना फोटोग्राफीची आवड होती. त्यांची फोटोग्राफीबद्दलची समज खूप खोल होती. अनेक प्रसंगी असे चित्रही समोर आले होते की, पंतप्रधान असूनही ते अनेकवेळा स्वतःची गाडी चालवत असत. राजीव गांधी हे एकमेव पंतप्रधान आहेत जे स्वतः कार चालवायचे. एवढेच नाही तर पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांनी देशहितासाठी अनेक धाडसी पावले उचलली. भारताने आजवर पाहिलेल्या सर्व मोठ्या यशाचे श्रेय राजीव गांधींना जाते. त्यांनी अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाची बीजे पेरली तसेच तळागाळातील नेत्यांना सक्षम करण्यासाठी पंचायती राज संस्थांना बळकट केले. राजीव गांधी यांनी भारतातील आयटी म्हणजेच माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार क्रांतीचे नेतृत्व खरे दूरदर्शी म्हणून केले. राजीव गांधी यांनी देशभरात उच्च शिक्षण कार्यक्रमांचा विस्तार करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचाही पुढाकार घेतला. राजीव गांधी यांनी राष्ट्र उभारणीत तरुणांच्या शक्तीचा उपयोग करण्यासाठी मतदानाचे वय २१ वरून १८ वर्षे केले. राजीव गांधींच्या नेतृत्वात भारताने वेगवान तांत्रिक प्रगती, सामाजिक-आर्थिक सुधारणा, संसाधनावर आधारित कृषी विकास पाहिला ज्यामुळे भारत एक उदयोन्मुख शक्ती बनला.

# माथेरान टॅक्सी प्रवास महागला

## चालक-मालक संघटनेकडून तब्बल सात वर्षांनी दरवाढ

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील माथेरान हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. या पर्यटनस्थळी पोहोचण्यासाठी नेरळ-माथेरान घाट रस्त्याने प्रवास करावा लागतो. गेली ५० वर्षे ३३० प्रवासी टॅक्सी या घाटातून माथेरानला पोहोचण्यासाठी रात्रंदिवस सेवा देत आहे. मात्र, इंधनाचे वाढते दर लक्षात घेता तब्बल ७ वर्षांनी टॅक्सी संघटनेकडून टॅक्सीचे भाडे वाढवण्यात आले आहे.



ब्रिटिशांनी शोधून काढलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी जाण्यासाठी नेरळ-माथेरान घाट हा एकमेव रस्ता मार्ग आहे. या रस्ता मार्गाने वर्षाकाठी लाखोचे संख्येने पर्यटक प्रवास करतात. या पर्यटकांच्या सेवेसाठी नेरळ-माथेरान टॅक्सी चालक मालक संघटना कार्यरत असून ३३० प्रवासी टॅक्सी या मार्गावर विभागीय परिवहन विभागाच्या मान्यतेने चालत आहेत. ही प्रवासी संघटना पर्यटकांना २४ तास सेवा देत असून या मार्गावर आजपर्यंत कोणत्याही टॅक्सी चालकांकडून महिलांबाबत कोणतीही चुकीची घटना घडली नाही. सुखरूप प्रवास घडवून देणाऱ्या नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेकडून प्रति प्रवासी १०० रुपये तिकीट आकारले जात होते. तिकिटांचा हा दर कोरोना काळातदेखील वाढवण्यात आलेला नव्हता. इंधनाचा वाढलेला दर त्यात पेट्रोल, गॅस, इंजिन ऑईल, वाहनांचे वाढलेले स्पेअर पार्ट, वाढलेले इन्शुरन्सचे दर यामुळे नेरळ-माथेरान टॅक्सी चालक मालक संघटनेच्यावतीने गेल्या सात वर्षापासून वाढलेले नव्हते ते प्रवासी दर वाढवण्याचे ठरवले आहे. नविन प्रवासी दर प्रति प्रवासी १२० रु आणि लहान मुलांना ६० रु राहतील आणि पूर्ण गाडीसाठी ६०० रु दर लागू करण्यात येतील. सध्या स्थानिक गाववाल्यासाठी प्रवासी दर १००/५० रुपये आहे तेच राहतील.

सात किलोमीटर लांबीचा हा घाटरस्ता देशातील अवघड वळणाच्या रस्त्यापैकी एक रस्ता समजला जातो. त्याचवेळी अखंडित सेवा देण्याचे कार्य या संघटनेकडून सुरू असून त्यांच्याकडून प्रवासी भाडे वाढ केली आहे. त्यात पूर्वीचे भाडे हे १०० होते, ते आता १२० रुपये प्रति प्रवासी करण्यात आले आहे. तर लहान मुलांसाठी ही भाडे ५० वरून ६० रुपये प्रति प्रवासी असे करण्यात आले आहे. ही भाडेवाढ नेरळ-माथेरान चालक-मालक टॅक्सी संघटना यांच्याकडून अध्यक्ष रवींद्र मिसाळ आणि नरेश कराळे यांनी जाहीर केली आहे. तरी प्रवासी वर्गाने सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले असून स्थानिक प्रवासी यांच्यासाठी कोणतीही भाडेवाढ करण्यात आलेली नाही, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ मे

१)श्रीम.विजया पुरूषोत्तम लिमकर पंतनगर, अलिबाग, २१-५-१९४४
२) श्री.निवास दामोदर मसाळ मु.विद्यानगर, अलिबाग, २१-५-१९४७
३)श्री.यल्लाप्पा नरसिंह पाटील पंतनगर, अलिबाग दि.२१-५-१९५०
४)श्रीम.विद्या रघुनाथ म्हात्रे श्रीबाग-२, दि.२१-५-१९५१
५)श्री.अनंत आत्माराम ठाकूर मु.दिघोडी, अलिबाग दि.२१-५-१९३५

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# शिवराज बांडे पुरस्काराने सन्मानित

| माणगाव | प्रतिनिधी |

तालुक्यातील बौद्धजन पंचायत समिती सात गाव ग्रुप शाखा क्र.९ गोवेले विभाग यांच्यातर्फे माणगाव येथील वाहतूक पोलीस हवलदार शिवराज ज्ञानोबा बांडे यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम रविवारी (दि.१७) तालुक्यातील मांजरवणे गावी उत्साहात पार पडला. वाहतूक पोलीस हवलदार शिवराज बांडे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



पोलीस हवलदार शिवराज बांडे हे वाहतूक शाखेत माणगाव येथे वाहतूक पोलीस म्हणून आपली सेवा बजावत आहेत. कर्तव्याशी प्रामाणिक राहत मुंबई-गोवा महामार्गावरील तसेच दिघी-पुणे राज्य मार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीतपणे सुरु ठेवण्यासाठी ते ऊन, पाऊस याची तमा न बाळगता तासनतास महामार्गावर उभे राहून आपले कार्य करीत असतात. याचबरोबर खाकी वर्दीतील देवमाणूस म्हणून त्यांनी आपला नावलौकिक रायगड पोलीस दलात व बहुजन समाजात कमाविला आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे विशेष असे नाव आहे. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# रायगड वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**कोर्लई :** रायगडच्या युवक फाउंडेशनतर्फे सांबरी येथील वात्सल्य वृद्धाश्रम आणि गोशाळा येथे दि.१ जून रोजी सकाळी १० वाजता रायगड जिल्हास्तरीय विद्यार्थी आणि खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामधे इ.८ वी ते कॉलेजच्या विद्यार्थ्यांना राजे छ. शिवाजी महाराज यांचे न्यायदान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी अनुभवलेले अंदमानातील दिवस, सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक कार्य, छ. संभाजी राजे यांचे शैक्षणिक कार्य, असे विषय आहेत. यासाठी पहिला गट प्रथम क्रमांकास दोन हजार रुपये, द्वितीय क्रमांकास दीड हजार रुपये, तृतीय क्रमांकास एक हजार रुपये आणि खुल्या गटातील प्रथम क्रमांकास दोन हजार रुपये, द्वितीय क्रमांकास दीड हजार रुपये, तृतीय क्रमांकास एक हजार रुपये देण्यात येणार आहेत. यासाठी प्रवेश फी १०० रुपये ठेवण्यात आली आहे. सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. अधिक माहिती व नोंदणीसाठी डॉ. संदीप वारगे, मो.९२७२६९८९२४, (अलिबाग) प्रा. संतोष पाटील मो.९८२०६००८५७,(साबरी) ॲड. सतीश शेळके (कर्जत) ९८८११३२२४८, उदय सबनीस मो.९३२५६२४६१६,(मुरुड) ॲड. दीपक पाटील मो. ९८७०३८३८८१ (पनवेल) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.डॉ.जयपाल पाटीलांनी केले आहे.

# गोसावी परिवारातर्फे धार्मिक कार्यक्रम

**खांब :** रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील नाथपंथी गोसावी समाज यांच्या वतीने रविवारी (दि.१७) विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने साजरे करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत पार पडलेल्या या विविध प्रकारच्या कार्यक्रमाप्रसंगी कुलस्वामिनी उत्सव अंतर्गत श्री सत्यनारायणाची महापूजा, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, सायंकाळी सामुदायिक हरिपाठ, रात्री महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले. या सर्व कार्यक्रमांसाठी धानकान्हे ग्रामस्थ व महिला तसेच तरूण मंडळ त्याचप्रमाणे परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थिती नोंदवून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. तर या कार्यक्रमासाठी नाथपंथीय गोसावी समाजातील बाहेरगावी असणाऱ्या परिवारातील सदस्यांनी आवर्जून उपस्थिती नोंदवून विविध कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.



# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**चिरनेर :** पेण तालुक्यातील वाशी येथील सागर विद्यालय वाशी शाळेतील माजी विद्यार्थी संघाचा स्नेहमेळावा रविवारी (दि.१७) पेण तालुक्यातील नेचर टच या फार्म हाऊसवर शाळेच्या जुन्या गोड आठवणींत नुकताच साजरा झाला.

सागर विद्यालय वाशी शाळेतून दहावी पास होऊन गेलेले विद्यार्थी जवळजवळ २८ वर्षांनी एकत्र आले. दरम्यान सर्व माजी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाचे उद्दिष्ट समोर ठेवून शाळेत केलेली मौज, मजा, मस्ती, काढलेल्या एकमेकांच्या खोड्या, कधी कधी शिक्षक शिकवीत असताना केलेली गंमत या साऱ्या शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, सर्वांनीच गमतीदार संवाद साधले.

मात्र आयुष्याशी झगडताना जीवनात घडलेल्या भावनात्मक प्रसंगांचीही यावेळी सर्वांनी आठवण करून दिली. एकंदरीत या माजी विद्यार्थ्यांची अत्मियता पाहता हा स्नेहमेळावा साजरा झाला. सर्व विद्यार्थी-विद्यार्थांनी आपआपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनी योग्य करियर निवडावे: उत्तम रेवाळे

| मुंबई | प्रतिनिधी |

सध्याच्या गतिमान आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पारंपारिक शिक्षणावर अवलंबून न राहता काळाची पावले ओळखून योग्य करियरची निवड करावी, असे आवाहन भारतीय स्टेट बँक, रत्नागिरीचे सह व्यवस्थापक तथा प्रख्यात करियर मार्गदर्शक उत्तम रेवाळे यांनी केले.

कुणबी समाज संघटना, गाव तुळसणी यांच्या वतीने बेर्डे वाडी येथील श्री जुगाईदेवी श्रमिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या १० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि 'करियर वाटा' मार्गदर्शन कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला तिन्ही वाड्यांमधील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कुणबी समाज मंडळातील १० वी, १२ वी, पदवी आणि इतर उच्च शैक्षणिक क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला. शैक्षणिक यशाची ही परंपरा अशीच पुढे चालू ठेवण्यासाठी समाज नेहमीच पाठीशी राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सत्कारानंतर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, समाजाकडून मिळालेले हे प्रोत्साहन आपल्याला भविष्यात अधिक उत्तम कामगिरी करण्यासाठी बळ देईल, अशी भावना व्यक्त केली. यादरम्यान पालक आणि विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मुख्य मार्गदर्शक उत्तम रेवाळे यांनी सध्याच्या काळातील विविध करियरच्या संधी, बँकिंग क्षेत्रातील रोजगाराच्या कक्षा आणि स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले.

# शिववंदना वाचनालयाचा वर्धापन दिन

| खांब | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याच्या मोठ्या उद्देशाने रोहा तालुक्यातील वाशी सारख्या ग्रामीण भागात सुरू करण्यात आलेल्या शिववंदना वाचनालय वाशी या वाचनालयाचा दहावा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शिववंदना वाचनालयाच्या माध्यमातून छ. शिवाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार करण्याबरोबरच वाशी गावातील शिवजन्मोत्व, गाव स्वच्छता मोहीम, गावात कचरा कुंडी व्यवस्था, गावातील कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रंगमंचनिर्मिती व सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे, विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप, दरवर्षी उन्हाळ्यात वनातील पशु-पक्षांना पाणी पुरवठा व्यवस्था, असे अनेक उपक्रम गेली १० वर्ष शिवावंदना वाचनालय वाशीच्या माध्यमातून उपक्रम राबविण्यात सातत्याने राबविण्यात येत आहेत. या वर्षीचा वर्धापनदिन सोहळाही मान्यवरांचे उपस्थितीत विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

# कोकणातील दुर्गम भागातील नेटवर्कसाठी नव्याने सर्वेक्षण

| मुंबई | प्रतिनिधी |

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम व डोंगराळ भागांमध्ये मोबाईल नेटवर्कच्या समस्यांबाबत जिल्हाधिकारी, भारत संचार निगमचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त सहभागातून तालुकानिहाय नव्याने सर्वेक्षण करण्यात यावे, तसेच त्यावर आधारित कृती आराखडा सादर करावा, असे निर्देश इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोबाईल नेटवर्क आणि ४जी सुविधांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत देवरुखसह रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मोबाईल रेंज नसल्याची समस्या आ. शेखर निकम यांनी मांडून प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये नेटवर्कच उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. डोंगराळ भागांमध्ये प्रत्यक्षात नेटवर्कची गंभीर समस्या कायम असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावर मंत्री ॲड. शेलार यांनी प्रत्येक तालुक्यात कनेक्टिव्हिटी दरबार आयोजित करण्याची संकल्पना मांडली. या उपक्रमात भारत संचार निगमचे अधिकारी, स्थानिक आमदार, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि नागरिक सहभागी होऊन प्रत्यक्ष समस्यांची नोंद करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७४६ गावांपैकी ७०४ गावांना मोबाईल कव्हरेज असून ६७७ गावांमध्ये ४जी सुविधा उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले, तर रत्नागिरीतील १५३८ गावांपैकी १४७२ गावांमध्ये मोबाईल कव्हरेज आणि १४६१ गावांमध्ये ४जी सेवा उपलब्ध असल्याचे सांगितले. अनेक अनकव्हर्ड गावांचा समावेश भारत संचार निगमच्या ४जी सॅच्युरेशन प्रकल्पात करण्यात आल्याची माहितीही अधिकाऱ्यांनी दिली.


जिल्ह्यातील सर्वच भागात उत्तम नेटवर्क कनेक्टिव्हीटीसाठी तालुकानिहाय नव्याने सर्वेक्षण करून कोणती गावे सॅच्युरेशन प्रकल्पात समाविष्ट करायची, कोणत्या ठिकाणी नवीन टॉवर आवश्यक आहेत आणि काम किती कालावधीत पूर्ण होणार याचा सविस्तर रोडमॅप तयार करण्याचे निर्देश मंत्री ॲड.शेलार यांनी दिले. यास भारत संचालक निगमचे कोल्हापूर विभागाचे प्रमुख पाटील यांनी या उपक्रमासाठी पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन अंतिम कृती आराखडा सादर करण्याचेही निर्देश मंत्री ॲड.शेलार यांनी दिले.

## जवानांसह वीरमाता-वीरपत्नींचा सन्मान | जुई गावाचा स्तुत्य उपक्रम

# सीमेवरील रक्षकांचे मायभूमीत कौतुक

| मुंबई | प्रतिनिधी |

"देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र बर्फात आणि ऊन्हा-तान्हात उभ्या राहणाऱ्या जवानांबद्दल केवळ आदर ठेवून चालणार नाही, तर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे प्रत्येक गावकऱ्याचे कर्तव्य आहे," असे प्रतिपादन जुई ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रकाश देवळे यांनी केले. जुई येथील नवतरुण मित्र मंडळ, श्री जन्नी देवी सेवा मंडळ, मुंबई आणि जुई ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.




या कार्यक्रमात भारतीय सैन्यात कार्यरत असणाऱ्या आणि सुट्टीवर आलेल्या गावातील तीन वीर जवानांचा, त्यांच्या त्यागी परिवारासह टाळ्यांच्या कडकडाटात आणि अत्यंत भावूक वातावरणात सन्मान करण्यात आला. यावेळी 'भारत माता की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला!

कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण बिंदू ठरला तो म्हणजे देशाचे रक्षण करणाऱ्या तीन नायकांचा झालेला सत्कार. यामध्ये नायक रूपेश रामदास दवंडे, नामदेव दवंडे, प्रमोद पांडुरंग भावे या तीनही जवानांना आणि त्यांच्या सहपरिवाराला (माता, पिता आणि पत्नी) मंचावर बोलावून जेव्हा त्यांचा गौरव करण्यात आला, तेव्हा उपस्थित ग्रामस्थांनी उभे राहून जवानांना मानवंदना दिली. जवान सीमेवर असताना मागे घर सांभाळणाऱ्या त्यांच्या कुटुंबाचा हा सत्कार खऱ्या अर्थाने कौतुकास्पद ठरला. याच सोहळ्यात ऑन ड्युटी असणारे लष्कराचे जवान राजेश शिंदे (तेलगें) यांची उपस्थिती तरुणांसाठी विशेष प्रेरणादायी ठरली. गावचे सरपंच समिर देवळे यांनी जवानांच्या कामगिरीचा गौरव केला. तर माजी पंचायत समिती सदस्या अश्विनी घरटकर आणि ग्रामपंचायत सदस्य रविंद्र बेर्डे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी परिसरातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात अरविंद घरटकर यांच्या अभ्यासपूर्ण प्रास्ताविकाने झाली. त्यांनी गावाचा लष्करी वारसा आणि मंडळांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. मुंबईतील जन्नी देवी सेवा मंडळ ग्रामस्थ मंडळ आणि गावातील नवतरुणांनी मिळून केलेले हे नियोजन जुई गावाच्या एकतेचे आणि देशप्रेमाचे प्रतीक ठरले आहे.

# निवडक



## रेवाळेवाडीत जल्लोष नृत्य स्पर्धा उत्साहात

**मुंबई :** नवतरुण मित्रमंडळ, रेवाळेवाडी (तळेकांटे) यांच्या वतीने आयोजित 'जल्लोष २०२६ नृत्य स्पर्धा' मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत लहान-मोठ्या गटातून व सामूहिक नृत्य प्रकारात एकूण २३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. गेल्या १० वर्षांपासून अखंड एकजूट राखत रत्नागिरी जिल्ह्यात आदर्श वाडी म्हणून नावारूपास आलेल्या रेवाळेवाडीच्या शिस्तीचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले. प्रसिद्ध नृत्य परीक्षक किरण बोरसुतकर यांनी, वादळ-पाऊस किंवा वीज नसली, तरी वेळेवर चोख नियोजन करणारे हे पहिलेच मंडळ आहे, अशा शब्दांत आयोजकांचा गौरव केला. वाडीप्रमुख सुरेश रेवाळे आणि ज्ञानेश्वर रेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदार, ग्रामस्थ व रसिकांचे मंडळाने आभार मानले.



## मधुबन कट्ट्याचे काव्य संमेलन


**चिरनेर :** कोमसाप मधुबन कट्ट्यावर नवोदितांना प्रेरणा देण्याचे कार्य गेली अनेक वर्ष मधुबन कट्टा करत आहे. मधुबन कट्ट्याच्या उरण येथे आयोजित करण्यात आलेल्या १२७ व्या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा.एल.बी. पाटील, चंद्रकांत मुकादम, प्रकाश म्हात्रे, बाजी घरत, भुवनेश पाटील, दत्ता निळवर्ण, रमाकांत घरत, अनंत पाटील, सुरेश गायकवाड, मिना बिस्ट, श्रुती म्हात्रे यांच्यासह अनेक साहित्यिक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अंधश्रद्धा निर्मूलन समाजसेवक रमाकांत जयराम घरत यांना सपत्नीक जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे यांना देखील जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, मधुबनचे अध्यक्ष राम म्हात्रे, सचिव अजय शिवकर, केंद्रीय सचिव संजय होळकर यांनी कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. सूत्रसंचालन शिवप्रताप पंडित यांनी केले. यावेळी 'सागर किनारा' या विषयावर कविसंमेलन घेण्यात आले. यात बालकवी अनुज शिवकर, भरत पाटील, अनिल भोईर,संपदा ठाकूर, संजीव पाटील, न.ग. पाटील, मारुती तांबे, नामदेव पाटील अजय शिवकर, भालचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, सुरेश मेस्त्री अशा एकूण १६ कवींनी कविता सादर करून कवी रसिकांची मने जिंकली. शेवटी संजय होळकर यांनी आभार मानले.



## पांजरपोळमध्ये गुरांसाठी स्प्रिंकलर यंत्रणा

**पनवेल :** पनवेल परिसरात दिवसेंदिवस तापमानात मोठी वाढ होत असून उष्णतेच्या तीव्र झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. वाढत्या उकाड्याचा परिणाम केवळ नागरिकांवरच नव्हे तर प्राणी व पक्ष्यांवरही होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेल येथील पांजरपोळमध्ये जनावरांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पांजरपोळमध्ये असलेल्या सुमारे २०० गुरांना उष्णतेपासून दिलासा मिळावा, यासाठी खास स्प्रिंकलर यंत्रणा बसविण्यात आली आहे. या स्प्रिंकलरमधून सतत पाण्याची फवारणी होत असल्याने परिसरातील तापमान तुलनेने थंड राहत आहे. त्यामुळे गुरांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळत असून जनावरे शांत व सुरक्षित वातावरणात राहत असल्याचे दिसून येत आहे. लहान वासरांसाठीही विशेष काळजी घेतली जात असून त्यांना पुरेसे पाणी व चारा उपलब्ध करून देण्यात येत आहे. वाढत्या तापमानात जनावरांचे आरोग्य अबाधित राहावे, यासाठी पांजरपोळ प्रशासन सतर्क असल्याचे सांगण्यात आले. उन्हाळ्याच्या दिवसांत प्राणीमात्रांनाही माणसांप्रमाणेच संरक्षणाची गरज असते. पनवेल पांजरपोळने केलेली ही व्यवस्था सध्या नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे.

## मोरेश्वर म्हात्रे यांचे निधन



**उरण :** उरण पूर्व विभागातील खोपटे (धसाखोशी) गावातील ज्येष्ठ लोकशाहीर मोरेश्वर सिताराम म्हात्रे (८८) यांचे शुक्रवारी (दि.१६) निधन झाले. त्यांच्या निधनाने उरण परिसरासह संपूर्ण कोकणातील लोककला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. मोरेश्वर म्हात्रे यांनी १९७० च्या दशकात आपल्या दमदार लोकगीत गायनातून संपूर्ण कोकणपट्टा अक्षरशः पिंजून काढला होता. पारंपरिक लोककला, कोकणी संस्कृती आणि ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या गीतांना रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असे. त्यांच्या आवाजाची आणि सादरीकरणाची खास शैली लोकांच्या मनात आजही कायम आहे. त्यांच्या पश्चात चार विवाहित पुत्र, एक विवाहित कन्या असा परिवार आहे. म्हात्रे यांच्या अंत्यविधीसाठी उरण पूर्व पंचकोशीतील शेकडो नागरिक, लोककलावंत आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## नामदेव रेवाळे यांचे निधन



**सुकेळी :** नागोठणेजवळच असलेल्या बाळसई गावातील नामदेव दगडू रेवाळे यांचे शनिवारी (दि.१६) अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ६२ वर्ष होते. अतिशय मनमिळावू स्वभाव व साधेपणा हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. रेवाळे यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे मुंबई या ठिकाणी काम करीत आपल्या संपूर्ण कुटुंबाला एक चांगल्या प्रकारे आधार दिला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा रेवाळे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२५ मे रोजी अंबानदी घाट तसेच, उत्तरकार्य गुरुवार दि.२८ मे रोजी राहत्या घरी बाळसई येथे होणार असल्याचे रेवाळे कुंटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

# निवडक




## मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळ पाणपोई सुरु

**रसायनी :** रसायनी पातालगंगा परीसरातील नागरीक बाजारहट करण्यासाठी मोहोपाडा बाजारपेठेत येत असतात. त्यांना पिण्याचे थंडगार पाणी उपलब्ध व्हावे याकरीता सामाजिक बांधिलकी जोपासत राकेश खराडे यांच्याकडून मोहोपाडा प्रवेशव्दाराजवळील पोलीस चौकीजवळ पाणपोई सुरु करण्यात आली आहे. या पाणपोईचे उद्घाटन सरपंच उमा मुंढे यांच्याहस्ते करण्यात आले. रसायनी पाताळगंगा हे औद्योगिक क्षेत्र असून या परीसराची सुसज्ज बाजारपेठ म्हणून मोहोपाडा शहराची ओलख आहे. परीसरातील आसपासच्या ग्रामीण भागातील नागरीक खरेदीसाठी मोहोपाडा बाजारपेठेत येत असतात. येथे पाणपोईंची व्यवस्था नसल्याने आपली तहान भागविण्यासाठी मिनरल वॉटर बाटली विकत घेवून आपली तहान भागवावी लागते. ही समस्या रसायनी परीसरातील पत्रकार समाजसेवक राकेश खराडे यांना अनेकांनी सांगताच पत्रकार राकेश खराडे यांनी तत्काळ लक्ष घालून नागरिकांना थंडगार पाणी देत तहान भागविण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी यावेळी दिपक कांबळे, रोशन राऊत, आकाश जुईंकर तसेच मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थ उपस्थित होते.



## हनुमंत लभडेंस 'आरोग्य रत्न' पुरस्कार

**पाताळगंगा :** सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या व विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या २००७ निसर्ग क्लिनिकल लॅबोरेटरीने गेल्या अनेक वर्षांत समाजासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.या उल्लेखनीय सेवाकार्यासाठी कल्याण पश्चिम येथील ब्राम्हण सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. भास्कर वाघ यांच्या हस्ते, भारतीय पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट आणि जीवन वेलनेस एंटरप्राइजेस यांच्या वतीने हनुमंत लभडे यांना प्रतिष्ठेचा 'आरोग्य रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. लॅबच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना सातत्याने सेवा देत सामाजिक बांधिलकी जपली आहे.तसेच आदिवासी वाडी आणि शाळांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरे,जनजागृती आणि विविध आरोग्य सेवा पुरवून समाजोपयोगी कार्य केले. गेली अनेक वर्ष विविध क्षेत्रांत उत्कृष्ट व समाजहिताचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची परंपरा या संस्थांकडून जपली जात असून, लभडे यांच्या सन्मानामुळे मोहपाडा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## सुधागडात रोजगार मेळावा उत्साहात

**सुधागड-पाली :** औद्योगिक कंपन्यांमधून उपलब्ध असलेल्या रोजगार संधींचा लाभ घेण्यासाठी युवक-युवतींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सुधागड तालुका मराठा समाज संस्थेचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी केले. युवा पिढीने करिअर घडवण्याच्या वयात निष्कारण वेळ वाया घालवू नये, रोजगार संधींचा लाभ घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. सुधागड तालुका मराठा समाज व यशस्वी स्किल्स लिमिटेड (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने पाली येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. स्व. सटुराम सखाराम साजेकर सभागृहात झालेल्या या मेळाव्यासाठी सुमारे १२० उमेदवारांनी नावनोंदणी केली होती. खोपोली, पनवेल, मुंबई, ठाणे, नाशिक व पुणे जिल्ह्यातील नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील शिका आणि कमवा योजना तसेच अप्रेंटिस योजना अंतर्गत पाच हजारहून अधिक रोजगार संधींसाठी मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये ५१ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली. या मेळाव्यासाठी सुजित बारसकर, योगेश मोरे, अशोक शिंदे, ॲड. नितीन शेवाळे, प्रदीप गोळे, दामोदर ठाकूर, नारायण दळवी, संजय बारसकर, साक्षी दिघे, निहारिका शिर्के तसेच रोजगार समितीचे सदस्य व समाज बांधव यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित दंत यांनी केले. आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष निंबाळकर यांनी केले तर सूत्रसंचालन केतन म्हसके यांनी केले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनेंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार- २५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321
- **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी** खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २० मे २०२६, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# टोरंट वाल्यांनी जंगल जाळलं

- उदरनिर्वाहाचे साधन हरपले
- पाली भागातील आदिवासी संतप्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याच्या पाली भागातील साई डोंगरामध्ये टोरंट वीज कंपनी जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने खासगी कंपनी म्हणून टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला परवानगी दिली आहे. मात्र, या कंपनीने आदिवासी लोकांचा रोजगार हिरवण्याचा प्रयत्न केला आहे. जंगलातून रानमेवा, कंदमुळे गोळा करून आपल्या कुटुंबाची उपजीविका करणाऱ्या जंगलाला आग लावली आहे, त्यामुळे या आदिवासी लोकांचा रोजगारच हिरावला आहे. दरम्यान, टोरंट कंपनीकडून आदिवासी बाधांवावर उपासमारीची वेळ आणली गेली असून आदिवासी ग्रामस्थ कंपनीच्या भूमिकेमुळे संतप्त झाले आहेत.

टोरंट कंपनीला वरिष्ठ पातळीवरून जमीन दिली असल्याचे बोलले जात आहे. पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायतीमधील आदिवासी वाडीमधील आदिवासी समाजाचे लोकांचा उदरनिर्वाह हा जंगलातील रानमेवा गोळा करून त्याची विक्री आजुबाजूच्या गावात करून होत असतो. दरवर्षी आदिवासी लोक दिवसभर जंगलात पावसाळ्यात रानभाज्या, तर हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात जंगली मेवा गोळा करीत असतात. आदिवासींच्या घरातील एक व्यक्ती या सर्व वस्तू आजुबाजूच्या गावात जाऊन विक्री करतात. त्यातून मिळणाऱ्या पैशातून अनेक आदिवासींची घरे चालतात. मात्र, यावर्षी यासर्व आदिवासी लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ने हिरावून घेतले आहे. या कंपनीच्या वीज प्रकल्पासाठी सरकारने आपली वन विभागाच्या मालकीची ६४० एकर जमीन देऊन टाकली. या जमिनीत असलेली शंभर दोनशे वर्षापूर्वीची जुनी झाडे यांची संख्या कमी व्हावी म्हणून या जंगलात टोरंट कडून आग लावण्यात आली. त्या आगीमध्ये अनेक झाडे जळुन कोलमडून पडली आहेत. प्रामुख्याने आदिवासी लोकांचा उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या जांभळी करवंदे यांच्या झाडांना प्रमुख लक्ष्य करण्यात आले.

### उपासमारीची वेळ

आंब्याच्या झाडांना आगीचे चटके बसल्याने झाडावर असलेले लहान लहान कैरी गळून पडल्या आहेत. तर जंगलात उन्हाळ्यात मिळणारी फळे देखील टोरंट कंपनीकडून लावण्यात आलेल्या आगीमध्ये जळून गेल्याने आता या आदिवासी लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे.



साई डोंगरामध्ये पूर्वी कधीही वणवे लागले नव्हते असे आदिवासी लोकांचे म्हणणे आहे. जरी कधी वणवा लागला तर आदिवासी लोक तेथे पोहचून लागलेली आग विझवायचे. त्याचे कारण त्या जंगलात असलेला रानमेवा हाच येथील लोकांचा उदरनिर्वाहाचा मुख्य आधार होता. त्यामुळे कधीही आग न लागणाऱ्या पालीच्या साई डोंगर भागात लागलेली आग ही मानवनिर्मित होती आणि ती टोरंट कंपनीकडून लावण्यात आल्याचा येथील स्थानिक आदिवासींचा आरोप आहे. जंगलात एकच वेळी असंख्य ठिकाणी आगीचे लोळ पाहून सर्वत्र हाहाकार माजला होता. नंतर आदिवासी लोकांनी जंगलात जाऊन पाहिले तर मोठ्या झाडांबरोबर मोठ्या प्रमाणात करवंदे यांच्या सर्व जाळ्या आगीत नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे आदिवासी बाधांवावर उपासमारीची वेळ आली आहे.

## जनगणना यशस्वी करण्यासाठी सहकार्य करा

**नवीन पनवेल :** भारत सरकारमार्फत देशभरात सन २०२७ ची जनगणना प्रक्रिया राबविण्यात येणार असून ही प्रक्रिया देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जनगणनेद्वारे लोकसंख्या, शिक्षण, निवास, रोजगार, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यासंबंधी अचूक माहिती संकलित केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासात्मक योजना व धोरणे आखत असते. तहसीलदार पनवेल मीनल भोसले यांनी पनवेल तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, जनगणना अधिकारी व कर्मचारी आपल्या परिसरात भेट देतील त्यावेळी त्यांना योग्य, अचूक व संपूर्ण माहिती द्यावी तसेच प्रशासनास पूर्ण सहकार्य करावे. जनगणने दरम्यान गोळा करण्यात येणारी माहिती ही पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून तिचा वापर केवळ शासकीय व सांख्यिकी उद्देशासाठीच केला जाईल असे त्यांनी सांगितले आहे.

# लोहोप येथे अस्थिरोग सेवा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे २०२५ पासून नियमित ओपीडी सेवा राबविण्यात येत आहे. दर महिन्यात दोन वेळा अस्थिरोग व त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टर येत असतात. तसेच दर महिन्यात चार वेळा बालरोग व स्त्रीरोग तज्ज्ञ या ठिकाणी येऊन मोफत तपासणी औषध उपचार, सल्ले देण्यात येतात. यामुळे या परिसरातील मोठ्या संख्येने रुग्ण उपस्थित होऊन या सेवेचा लाभ घेते आहे. सदर सदर ओपीडी सेवा सुरू करण्यासाठी बिर्ला कार्बन कंपनीच्या सीएसआर विभागाच्या सहकार्याने, श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थाचे अरविंद पाटील तथा एमजीएम कमोठे रुग्णालय यांच्या संयु विद्यमाने राबविण्यात येत आहे.




> **ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना आर्थिक अडचणीमुळे तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळणे कठीण होते. मात्र, गेल्या वर्षापासून ओपीडी सेवेमुळे बालरोग, स्त्रीरोग, अस्थिरोग व त्वचारोग तज्ज्ञांचा मोफत सल्ला व उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होत असून रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. -डॉ. मंगेश देशमुख वैद्यकीय अधिकारी लोहोप**

त्यांच्या या सहकार्यामुळे रुग्णांना वेळेची आणि पैशाची बचत होते आहे. आजार हे सातत्याने वाढत असतात. मात्र, आपण त्याकडे दुर्लक्ष करत असतात. काही वेळेला आर्थिक परस्थितीच्या अभावामुळे गेल्या वर्षापासून सुरू झालेल्या लोहोप येथे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ओपीडी सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळत आहे.

# कोंकण कृषी विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

**। कर्जत/खोपोली । प्रतिनिधी ।**

डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचा ५४ वा वर्धापन दिन येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात सहयोगी संशोधन संचालक डॉ.बी. डी. वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोत्साह साजरा करण्यात आला.

विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ, कॅरम, पुरुष व महिला संगीत खुर्ची, अंताक्षरी व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धांमध्ये शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, मजूर व कंत्राटी कामगारांनीसुद्धा हिरीरीने सहभाग नोंदवला. बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्ष डॉ. बी. डी. वाघमोडे हे होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ वाघमोडे यांनी प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला मंजूर झालेल्या विविध प्रकल्पांचा उहापोह करीत विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन केले.



यानिमित्ताने मागील वर्षी उत्कृष्ट काम करणाऱ्या कनिष्ठ भात पैदासकार डॉ. एम. पी. गवाई, कनिष्ठ कृषिविद्यावेत्ता डॉ. एन. व्ही. म्हसकर, कृषी पर्यवेक्षक माहेशकुमार घारपुरे, वरिष्ठ संशोधन छात्र अनिरुद्ध मदने, कार्यालय अधीक्षक एन. एल. निरडे यांना डॉ. वाघमोडे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या स्पर्धकांना गुलाबपुष्प, भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. एन. व्ही. म्हसकर, महेश घारपुरे, अनिरुद्ध मदने, डॉ. एम. पी. गवई यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.

## गीत रामायणाचे आयोजन

**माणगाव :** भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि संगीत परंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या सुप्रसिद्ध गीत रामायण या भावस्पर्शी कार्यक्रमाचे आयोजन अक्षरा म्युझिक अकॅडमी, माणगाव-रायगड यांच्या वतीने शनिवारी (दि.२३) मे रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत करण्यात आले आहे. धर्मवीर रामभाऊ पवार रंगमंच, श्री गुरुदत्त मंदिर, मोर्बा रोड, श्रीवर्धन-मुंबई बायपास रोड, माणगाव येथे हा बहुप्रतिक्षित सांगीतिक सोहळा रंगणार आहे.

# वशेणी केळवणे खाडीकिनारी जेट्टीची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

समुद्रातून मासेमारी करून परतणाऱ्या बोटींना केळवणे व वशेणी येथील खाडीकिनाऱ्यावर जेट्टीची सुविधा उपलब्ध नसल्याने मासेमारी करणाऱ्या ग्रामीण भागातील बांधवांना अनेक समस्यांचा सामना करत आपल्या बोटी कुठे ना कुठे नांगरुन ठेवण्याची वेळ येत आहे. उरण तालुक्यातील वशेणी व पनवेल तालुक्यातील केळवणे ग्रामपंचायत हद्दीतील खाडीकिनाऱ्यावर मासेमारीसाठी जेट्टी बांधून मिळावी अशी मागणी अखिल भारतीय मच्छीमार खलाशी संघटनेचे अध्यक्ष विश्वनाथ म्हात्रे यांनी शासनाकडे केली आहे. म्हात्रे यांनी माहिती देताना सांगितले की, उरण, पनवेल, पेण तालुक्यातील ग्रामीण भागातील बांधवांचा उध्दर्निवाहाच प्रमुख साधन भात शेती बरोबर मासेमारी हा व्यवसाय आहे. त्यामुळे वर्षातील नऊ महिने समुद्रात जाऊन मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. मात्र, पनवेल तालुक्यातील कळवणे, साई, दिघाटी, उरण तालुक्यातील वशेणी,आवरे, कडापे, गोवठणे, कोप्रोली, दिघोडे, खोपटा, पिरकोन आणि पेण तालुक्यातील दादर, वरेडी, सोनखार, भाल, कोपर, डोलघर आदी ग्रामीण भागातील मासेमारी करणाऱ्या बांधवांना खाडीकिनाऱ्यावर जेट्टीची सुविधा उपलब्ध नसल्याने बोटी नांगरुन ठेवण्यासाठी अनेक समस्यांचा सामना हा करावा लागत आहे. तरी उरण तालुक्यातील वशेणी व पनवेल तालुक्यातील केळवणे ग्रामपंचायत हद्दीतील खाडीकिनाऱ्यावर मासेमारीसाठी जेट्टी बांधून मिळण्याची निवेदनाद्वारे केली आहे.

# शिवा मोरेची सैन दलात निवड



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल गावासाठी अभिमानाचा क्षण ठरलेला आहे. अवघ्या १८ व्या वर्षी शिवा विनोद मोरे यांनी भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध तयारी आणि देशसेवेची प्रबळ जिद्दीच्या बळावर शिवा यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अहमदनगर येथे पार पडलेल्या सैन्य भरती प्रक्रियेत तब्बल १०० जागांसाठी सुमारे २ हजार ५०० उमेदवार मैदानात उतरले होते. अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक असलेल्या या प्रक्रियेत शिवा यांनी २०० पैकी तब्बल १८२ गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. सध्या ते पुणे येथील वाडिया महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच देशसेवेचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी सातत्याने सराव आणि तयारी केली होती. लहानपणापासूनच भारतीय सैनिक बनण्याची तीव्र इच्छा मनात बाळगणाऱ्या शिवा यांनी अनेक अडचणींवर मात करत स्वतःला सिद्ध केले. अथक सरावाच्या जोरावर त्यांनी सैन्य भरतीची कठीण परीक्षा यशस्वीरीत्या पार केली. त्यांच्या यशामुळे माणगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे मोरे कुटुंबाची ही चौथी पिढी देशसेवेसाठी सैन्यात दाखल होत आहे. त्यामुळे या यशाला केवळ वैयक्तिक यशाचे नव्हे, तर घराण्याच्या देशभक्तीच्या परंपरेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिवा यांच्या वडिलांनी त्यांना लहानपणापासूनच सैनिक होण्याची प्रेरणा दिली आहे.

# खोपोलीत नालेसफाई कधी होणार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरात पावसाळ्यात नाले-गटारे तुंबून पूरस्थिती निर्माण होऊ नये याकरिता खोपोली पालिका आरोग्य व बांधकाम विभाग अंतर्गत कृती आराखडा तयार करून विविध प्रभागातील लहान-मोठी गटारे नाले, सफाईचे काम दरवर्षी हाती घेतले जाते. मे महिना काही दिवसांनी संपणार असून पाऊस कधीही सुरू होण्याची परिस्थिती असतानाही शिलफाटा पटेल नगर भागासह ठीक-ठिकाणी गटार व नालेसफाईचे काम अद्याप सुरू झाली नाही. यंदाच्या पावसात खोपोली तुंबळ्यावर लोकप्रतिनिधी धावणार का असा संतप्त सवाल नागरिक विचारात आहेत. मात्र, पटेल नगर भागात पाहणी करून नागरिकांची दिशाभूल करण्याची मोहीम पालिकेने हाती घेतल्याची चर्चा येथील नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

प्रत्येक प्रभागातील मुख्य गटारांमधील आडकलेला कचरा काढणे गरजेचे आहे. मागील दोन वर्षापासून पाऊस लवकर हजेरी लावलो त्यामुळे पालिकेने शहरातील नालेसफाई आणि गटारे सफाईची करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.



> **खोपोली शिळफाटा परिसरातील पटेल नगर भागात सर्व धर्मीय लोक वास्तव्यास आहेत. ते याठिकाणी छोटे मोठे व्यवसाय करत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य वास्तव्यात असणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा दृष्टीने येथील गटारांची सफाई करणे करणे गरजेचे आहे. येथील गटारे तुंबली आहेत, त्यामुळे दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. -वशिद रजपूत**

निसर्गातील अद्भुत किमया | पावसाळ्यापूर्वी ग्रामीण भागात पक्ष्यांची घरटी

# सुगरण पक्ष्यांची घरट्यांसाठी लगबग

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

वळवाच्या पावसाची चाहूल लागताच ग्रामीण भागातील निसर्ग पुन्हा एकदा जिवंत झाला असून सुगरण पक्ष्यांनी आपल्या घरट्यांच्या बांधणीसाठी लगबग सुरू केली आहे. ओढे, नाले, विहिरी तसेच तळ्याकाठच्या झाडांवर पाण्याच्या दिशेने लोंबकळणारी सुगरण पक्ष्यांची कलात्मक घरटी सध्या नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी ही घरटी म्हणजे पावसाच्या आगमनाची जणू नैसर्गिक सूचना ठरत आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जून महिन्याच्या प्रारंभीच सुगरण पक्ष्यांनी घरटी बांधण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे नर पक्षी गवताच्या काड्या, पेंढा, धागे गोळा करून हवेत लटकणारी सुंदर घरटी तयार करतात. घरट्यांची रचना इतकी मजबूत आणि आकर्षक असते की, ती पाहून प्रत्येकजण अचंबित होतो. या घरट्यांमध्ये सुरक्षित प्रवेशद्वार, अंडी ठेवण्याची जागा आणि पिल्लांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र भाग तयार करण्यात येतो. ही घरटी प्रामुख्याने काटेरी झाडांवर किंवा पाण्याच्या परिसरातील झाडांच्या फांद्यांवर बांधली जातात. यामागे पिल्लांचे संरक्षण हा मुख्य उद्देश असतो. पावसाळ्यात वाऱ्याचा वेग, पावसाचा मारा आणि इतर पक्ष्यांपासून धोका टाळण्यासाठी सुगरण पक्षी अतिशय नियोजनपूर्वक जागेची निवड करतात. त्यामुळे त्यांच्या या कौशल्यपूर्ण बांधकामाचे ग्रामस्थांकडून नेहमीच कौतुक केले जाते. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी सांगतात की, सुगरण पक्ष्यांची हालचाल वाढू लागली की पावसाचे आगमन जवळ आले आहे, अशी खात्री वाटू लागते. त्यामुळे शेतीच्या कामांनाही वेग येतो. निसर्ग आणि पक्ष्यांमधील हे अनोखे नाते ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग मानले जाते.



### निसर्गप्रेमींना आनंद

पावसाळ्याच्या आगमनापूर्वी सुगरण पक्ष्यांची सुरू झालेली ही लगबग ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आकर्षण ठरत आहे. निसर्गप्रेमींना आनंद देणारी ठरत आहे. निसर्गातील या सुंदर कलाकृती पाहण्यासाठी अनेकजण ओढे, तलाव आणि शेत परिसरात गर्दी करताना दिसत आहेत.

# पनवेल येथील वळवली बस स्टॉप जवळ आढळला मृतदेह

। पनवेल । प्रतिनिधी ।
पनवेल तालुक्यातील वळवली गाव बस स्टॉप येथे एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

या व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, उंची ५ फुट, डोक्याचे केस काळे, पुढील बाजूस टक्कल पडलेले, दाढी काळी-पांढरी बारीक फ्रेंच कट असलेली, मिशा काळ्या पांढऱ्या वाढलेल्या, इसमाचा रंग सावळा आहे. त्याच्या गळ्यामध्ये काळ्या पांढऱ्या रंगाच्या मण्यांच्या दोन माळा आहेत.

तसेच, तो अंगाने मध्यम आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा सपोनि राजरत्न खैरनार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस अधिक्यांनी केले आहे. त्याचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, एप्रिल २८, २०२६ वैशाख ८, शके १९४८**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२. दिनांक २८ एप्रिल २०२६.**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस- २०२५/प्र.क्र.५०/रस्ते-८.-ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त अधिनियम' असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट-कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८, दिनांक १३ मार्च २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त अधिसूचना' असा केला आहे) याद्वारे, रेवस रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र.५) (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त महामार्ग' असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि महाराष्ट्र शासकीय राजपत्रात उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. २८) याच्या कलम ३ तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/भाग-२/रस्ते-८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार घोषणेच्या प्रसिद्धिसाठीचा कालावधी २८ एप्रिल, २०२६ पर्यंत आणखी एक वर्ष वाढविण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**

**जमिनीचे विवरण**

**तालुका: श्रीवर्धन** — **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र./गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २ | दांडा | ११३ पैकी | ०.०१९९ |
| ३ | दांडा | १०२ पैकी | ०.०००८ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

भाग चार-ब-१९१-२अ
**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३२/६२५/२०२६**

**ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड**

**जाहीर नोटीस**

**दि.२०/०५/२०२६**
**जा.क्र.    /२०२५**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरेकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | ८०६/१ | दळी बिल्डींग रविकिरण हॉटेल मागे | आर.आर.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका | उषा शरद रानवडे | प्रसाद शरद रानवडे |
| २ | २ | १४४०/८ | कमलकुंज सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका २ रा मजला ७६० चौ.फुट | करूणा चंद्रकांत धुमाळ | मनिष मधुकर पाटील मानसी मनिष पाटील |
| ३ | ६ | ९४९/३ | प्रभात दर्शन सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका तळमजला ५७३ | दिनेश शिवाजी कुसाळकर | पुजा दिनेश कुसाळकर |
| ४ | ३ | २९१/४ | कोहीनुर सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका १ मजला | राखी अमित जोशी | राखी राजाराम डबरी |
| ५ | ४ | १६५२/१ | दळी गार्डन शिवनगर रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका | शंकुतला चिंतामण म्हात्रे | सौ.स्नेहल मिलिंद लांगी, पार्थ मिलिंद लांगी |
| ६ | ४ | १४७६/१५ | गौरीनंदन सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका | रमेश शिवराम चोरगे | श्रीम.छाया रमेश चोरगे व इतर ३ |
| ७ | २ | १११९/१ | सुमंगल सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ५१६ चौ.फुट | संजय राजाराम मोहिते, वैशाली संजय मोहिते | बाबासाहेब जगन्नाथ पवार |
| ८ | ४ | १३०३/१/२ | गोंधळपाडा मानट रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ७३० चौ.फुट | श्री.महेश माणिकराव पाटील | अजिंक्य विलास पानसरे, अक्षया विलास पानसरे |
| ९ | २ | २१७०/७ | ॲकॉन्स प्रिव सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ७३० चौ.फुट | अजित जयराम जाधव | अशोक शांताराम नाईक |
| १० | २ | १११९/४ | सुमंगल सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चढता तळ ४८२ चौ. फुट | ज्ञानेश्वर विठ्ठल विर | सुनिल महादेव पाटील जयश्री सुनिल पाटील |
| ११ | १ | ११ | तांबोळी हॉस्पिटल | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम | आदित्य विकास तांबोळी | निल अतुल कोतेकर |
| १२ | ५ | १०९७/२४ | संकुल सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम | अंजली भिकाजी म्हात्रे | भिकाजी भिवा म्हात्रे व इतर |

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा,दरबार रोड, ता.मुरुड. जि.रायगड)

ज.म.र अर्ज २८/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. इकबाल महमुद पंगारकर,
रा. मजगाव ता. मुरुड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव,
ता.मुरुड-जंजिरा,जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०५-०१-१९५८ रोजी मौजे मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०५-०१-१९५८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे, न्यायालयांत दिनांक १०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा,दरबार रोड, ता.मुरुड.जि.रायगड)

ज.म.र अर्ज २६/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. शकील महमुद पंगारकर,
रा. मजगाव ता. मुरुड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १४-०६-१९६२ रोजी मोजे मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १४-०६-१९६२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे, न्यायालयांत दिनांक १०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री तुकाराम शिवाजी भापकर, रा. हराळमळा, रामवाडी, गुंडेगाव, अहमदनगर ४१४१०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कुरूंग, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत .**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४/२/ब | ०.२६.०० पो.ख. ०.०६.०० | ०.१२ | श्री. घनश्याम आवधराज यादव. |
| ४/२/क | ३.४१.०० पो.ख. ०.७७.०० | १.८९ | |
| ४/२/ड | ०.३६.०० पो.ख. ०.०९.०० | ०.१९ | |
| २६/१/अ/३ | ०.८१.०० पो.ख. ०.१८.०० | ०.३५ | |
| २६/१/अ/४ | ३.६५.०० पो.ख. ०.९२.०० | १.९० | |
| २६/२ | ०.२५.०० पो.ख. ०.०४.०० | ०.१० | |
| २९/१/अ/१ | ०.७६.०० पो.ख. ०.०५.०० | ०.८५ | |
| २९/१/अ/६ | ०.४७.०० पो.ख. ०.०६.०० | ०.४५ | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २१/०५/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६/९०९४५२५५५५.

**जाहीर सूचना**

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की १. एकनाथ नागू म्हात्रे, २. प्रमोद नागू म्हात्रे व ३. प्रवीण नागू म्हात्रे, यांनी आमच्या अशिलांसमवेत सर्व भारांपासून मुक्त तसेच स्पष्ट व विपणनयोग्य हक्क असलेल्या खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत शेतजमीन विवरण गट क्र. २७९, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या शेतजमीनीच्या भागावर (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) हक्क मार्ग मंजुरीकरिता बोलणी केली आहेत.

कोणीही व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, मृत्यूपश्चात वारसा, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, निषेधाज्ञा, गहाण, प्रभार, न्यास, उत्तराधिकार, वारसा वा कंत्राट वा सामंजस्य करार, सुविधाधिकार, हक्क-मार्ग, ताबा, कब्जा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय उपभोग, सुविधाजनक हक्क, स्थायी व शाश्वत हक्क मार्ग आदी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद ॲन्ड कं., वकील, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे किंवा ई मेलच्या माध्यमातून <harshil.parekhpurnanand.co.in> येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आमचे अशील हे असे हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी अधित्यागित व परित्यागित आहेत असे गृहीत धरतील. पुढे, सदर सूचना कालावधीत कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास, असे कोणतेही दावे नाहीत असे गृहीत धरले जाईल.

**अनुसूची**
**सदर मालमत्तेचे विवरण**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या रिक्त शेतजमीन वा भूभागाचा सर्व तो भाग व भूखंड, विवरण गट क्र. २७९, मोजमापित ० हेक्टर ७ आर ०० चौ. मी. , ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलीबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे -
**उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. ३१०, पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. २७८, दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. २७८ व २८०, पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. २८०.**
**दिनांक : २१ मे, २०२६**

**पूर्णानंद ॲन्ड कं. करिता**
वकील व सॉलिसिटर्स
६५, टॅमरिंड लेन, फोर्ट चेंबर्स, सी विंग, २ रा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
ई मेल : harshil.parekh@purnanand.co.in

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**जाहीर नोटीस**

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळिवणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे.वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग १६६/१९०/१९६/१९७/१९८/१७९ एकूण क्षेत्र ४.८०.०० (आर.चौ.मी), आकारणी ४८.०० (रु.पैसे) ही मिळकत विद्यमान मालक श्री.पराग मोहन गवांडे रा.अलिबाग यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदती रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक -२१/०५/२०२६.

**(ॲड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी. स्टॅंड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
९८५०४८१२३४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आम चे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्यहरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - बांगरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| अजीज जुम्माखान खान अनवर अली अहमदअली करमाली | ८८ | ४ | ०-७२-०० | ० ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २१/०५/२०२६

**जाहीर सुचना**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेत जमिन मिळकत श्रीमती चंद्रभागा शिवराम मानकर व श्री.जयदास हरी मानकर, राहणार बोरपाडा, अलिबाग यांच्या सामाईक मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्रीमती चंद्रभागा शिवराम मानकर हिच्या हिश्श्याची म्हणजेच ०-२३-५५ आर्स शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायम स्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणगांव, ता.अलिबाग. | २९२ | ०-३६-७० ०-१०-४० पो.ख. ०-४७-१० एकूण | ९-९२ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्रीमती चंद्रभागा शिवराम मानकर हिच्या मालकीच्या अविभक्त हिश्श्याची म्हणजेच ०-२३-५५ आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २०/०५/२०२६

सही/
**(ॲड. निवास ना. पाटील)**
**श्री क्षेत्र, सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड.**
**खरेदीदाराचे वकील**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# माथेरानमध्ये मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

## ● पर्यटक अन् स्थानिक लाल मातीवर धावले ● निखिल सिंग यांनी जिंकली मिनी मॅरेथॉन




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या शहराच्या निर्मितीला गुरूवारी (दि.२१) १७६ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने माथेरान नगरपरिषद यांच्यावतीने मॅरेथॉन तसेच चालण्याची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत माथेरानकर आणि पर्यटक सकाळी ७.०० वाजता लाल मातीच्या रस्त्याने धावले. तर, या स्पर्धेत पर्यटक निखिल सिंग यांनी ७ किलोमीटरची मिनी मॅरेथॉन विक्रमी वेळेत जिंकत सर्वांची वाहवा मिळवली.

माथेरान या ब्रिटिशांनी शोधून काढलेल्या शहराला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळाला आहे. या शहराचा वाढदिवस दि.२१ मे रोजी साजरा होतो आणि त्यानिमित्ताने माथेरान नगरपरिषदेच्यावतीने मिनी मॅरेथॉन आणि चालण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील श्रीराम चौकात सकाळी ७.०० वाजता नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उप नगराध्यक्ष संतोष शेलार, मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि नियोजन सभापती शिवाजी शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवल्यानंतर स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेची संकल्पना पालिकेच्या दिव्यांग सेलच्या सभापती रिझवाना शेख यांची होती. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेसाठी चार गट तयार करण्यात आले होते, त्याचवेळी खुला गट देखील ठेवण्यात आला होता. या सर्व गटांमध्ये पर्यटक देखील स्थानिकांच्या जोडीला चालण्याच्या आणि धावण्याच्या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, पनवेल जळगाव येथून स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धकांना शुभेच्छा देण्यासाठी विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, पालिकेचे शिक्षण सभापती सुनील शिंदे, बांधकाम सभापती गौरंग वाघेला, दिव्यांग कल्याण सभापती रिझवाना शेख, महिला बालविकास सभापती ऐश्वर्या शिंदे, उपसभापती सुरेखा साळुंखे, तसेच नगरसेवक अर्चना भिलारे, लता ढेबे,कमल गायकवाड, प्रतिभा घावरे, अनुसया ढेबे, अनिता रांजणे, नगरसेवक सोहेल महापुळे, किरण पेमारे, सचिन दाभेकर आदी उपस्थित होते.

खुल्या गटात सुजाता मुंडेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावत ५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले. तर, या गटात प्रथमा भगत यांनी दुसरा, अक्षिता भगत यांनी तिसरा, दर्शना सराई आणि काजल प्रजापती यांनी चौथा क्रमांक पटकावला. पहिल्या गटात मानसी आखाडे हिने प्रथम, महिमा साळवी हिने द्वितीय, तर मयुरी आखाडे हिने तिसरा क्रमांक पटकावला. दुसऱ्या गटात मंगेश पारधी प्रथम, मयूर बरतड द्वितीय, तर सर्वेश लावंड याने तिसरा क्रमांक पटकवला. तिसऱ्या गटातील महिलांच्या चालण्याच्या स्पर्धेत ममता कुंभारे व प्रतीक्षा आचरेकर यांनी संयुक्तपणे पहिला क्रमांक पटकावत प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस मिळविले. तर, अंकिता गायकवाड आणि वर्षा ढोले यांनी संयुक्तपणे दुसरा क्रमांक पटकावत प्रत्येकी ५ हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. तसेच, छाया तायडे यांनी तिसरा क्रमांक पटकावला. चौथ्या गटातील खुला मिनी मॅरेथॉन सात किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत निखिल सिंग यांनी प्रथम क्रमांक पटकावत २० हजाराचे पारितोषिक मिळविले. तर, दुसरा क्रमांक सुरज झोरे आणि तिसरा निखिल साहनी यांनी पटकावला.

## निवडक



### विधी भोरची उल्लेखनीय कामगिरी

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील भोरवाडी-अवसरी खुर्द येथील विधी भोर (१३) हिने जलतरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिने धामणतर जेट्टी ते अटल सेतू हे तब्बल ४२ किलोमीटर अंतर अवघ्या ७ तास ३२ मिनिटांत यशस्वीरीत्या पूर्ण करत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल विधीला सन्मानित करण्यात आले. हा सन्मान निशांत भगत यांच्या हस्ते प्रदान केला. विधीला लहानपणापासूनच जलतरणाची विशेष आवड असून ती सध्या मुंबईतील सानपाडा येथे वास्तव्यास आहे. सोमवारी पहाटे २ वाजून २२ मिनिटांनी विधीने खाडीतून आपल्या जलतरण मोहिमेला सुरुवात केली. अथक प्रयत्न आणि जिद्दीच्या बळावर तिने अटल सेतू परिसरात ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

### फिल सॉल्ट आरसीबी संघात परतणार



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीगच्या प्ले ऑफमधील तीन संघ निश्चित झाले आहेत. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १८ गुणांसह प्ले ऑफमध्ये पोहोचण्याचा पहिला मान पटकावला आहे. आता दि.२२ मे रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणाऱ्या शेवटच्या साखळी सामन्यात विजय मिळवून ते क्वालिफायर १ मधील जागा पक्के करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहेत. अशात त्यांच्यासाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. बोटाच्या दुखापतीमुळे महिनाभर आयपीएलपासून दूर राहिलेला फिल सॉल्ट या आठवड्याच्या अखेरीस भारतात परतणार आहे. सॉल्टला दि.१८ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात चौकार वाचवण्यासाठी झेप घेताना डाव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली होती. तेव्हापासून तो संघाबाहेर आहे आणि बोट बरे होईपर्यंत आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी गेल्या महिन्यात मायदेशी परतला होता.

### संघात नव्या चेहऱ्यांना संधी

**नवी दिल्ली :** आयपीएल स्पर्धा संपल्यानतर जूनमध्ये होत असलेल्या अफगाणिस्तानविरुद्धचा एकमेव कसोटी सामना आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघांची निवड मंगळवारी (दि.१९) जाहीर करण्यात आली. यावेळी अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. काही नव्या चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली. त्यात मानव सुतार, हर्ष दुबे, गुरनुर ब्रार आणि प्रिन्स यादव यांचा समावेश आहे. परंतु, यावेळी रिषभ पंतला दुहेरी धक्का बसला. त्याने अफगाणिस्तानविरुद्ध कसोटी संघात स्थान तर राखले, परंतु उपकर्णधारपद गमावले. त्याचबरोबर एकदिवसीय संघातूनही त्याला दूर करण्यात आले. तसेच, एकदिवसीय संघात यष्टीरक्षक म्हणून के.एल. राहुलला पहिली पसंती मिळत असली तरी पंत संघात कायम होता. आता मात्र त्याचे कसोटीतील उपकर्णधारपद गेले आणि एकदिवसीय संघातूनही दूर करण्यात आले. त्याच्याऐवजी दुसरा यष्टीरक्षक म्हणून ईशान किशनची निवड करण्यात आली. याशिवाय ३७० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या रवींद्र जडेजालाही दोन्ही संघांत स्थान मिळालेले नाही. दरम्यान, जडेजा तसेच अक्षर पटेल संघात नसल्यामुळे आता हर्ष दुबे आणि मानव सुतार या फिरकीपटूंना भारताकडून पदार्पणाची संधी मिळू शकते. या निर्णयाबाबत संघनिवड जाहीर करताना निवड समिती अध्यक्ष अजित आगकरांनी स्पष्ट कारणं दिली आहेत.

### तीन वर्षांनी नेमार ज्युनियरचे पुनरागमन



**नवी दिल्ली :** नेमार ज्युनियर याचे तब्बल तीन वर्षांनंतर ब्राझीलच्या फुटबॉल संघात पुनरागमन करण्यात आले आहे. दि.११ जून ते १९ जुलै यादरम्यान अमेरिका, कॅनडा व मेक्सिको येथे फुटबॉल विश्वकरंडकाचा थरार रंगणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धे साठी ब्राझीलच्या संघाची घोषणा करण्यात आली. मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसीलोटी यांनी ब्राझीलच्या २६ खेळाडूंच्या नावांवर शिक्कामोर्तब केले. नेमार ज्युनियर हा २०२३ पासून ब्राझील संघातून खेळलेला नाही, परंतु अजूनही त्याला देशासाठी खेळायचे होते. वारंवार याबाबत त्याने इच्छाही व्यक्त केली होती. मात्र, मार्च महिन्यात झालेल्या मैत्रीपूर्ण सामन्यातून त्याला वगळण्यात आले होते. मागील वर्षभरात त्याला दुखापतीचाही सामना करावा लागला होता. आता नेमारच्या समावेशामुळे सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम लागला आहे. दरम्यान, नेमार याच्यासह विनिशियर ज्युनियर, राफीन्हा, मारकिन्होस, गॅब्रियल मार्टीनेली व गॅब्रियल मगालहेस या खेळाडूंनाही ब्राझीलच्या संघात संधी देण्यात आली आहे.

### वैभव सुर्यवंशी फलंदाजीत आघाडीवर

**नवी दिल्ली :** आयपीएलमधील १३ सामन्यांत ५७९ धावा करून ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आघाडीवर असलेल्या वैभवने आतापर्यंत एकूण ३१ टी-२० सामन्यांमध्ये १२८० धावा केल्या आहेत. राजस्थान रॉयल्सकडून आयपीएलमध्ये २० सामने खेळण्याव्यतिरिक्त त्याने इंडिया 'ए' आणि बिहार संघांकडूनही टी-२० सामने खेळले आहेत. त्याने राजस्थानकडून २० सामन्यांत ८३१ धावा केल्या आहेत. बिहारकडून ७ सान्यांत २१०, भारत 'अ'कडून ४ सामन्यांत २३९ धावा त्याच्या नावावर आहेत. त्याच्या एकूण ३१ सामन्यांत ४ शतके व ४ अर्धशतके आहेत. या आधी टी-२० मध्ये भारतीय किशोरवयीन खेळाडूने सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम इशान किशनच्या नावावर होता. इशानने वयाच्या विसाव्या वर्षापूर्वी ५५ टी-२० सामन्यांत ११९४ धावा केल्या होत्या. टी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय किशोरवयीन खेळाडूंच्या यादीत वैभव आणि इशान यांच्यापाठोपाठ तिलक वर्मा (१०७५ धावा), रियान पराग (१०१९ धावा) आणि संजू सॅमसन (१०१६ धावा) यांचा क्रमांक लागतो.

## राजस्थानचा नवाबांवर दमदार विजय



**। जयपुर । वृत्तसंस्था ।**

राजस्थान रॉयल्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ७ गडी राखून पराभव केला. त्यामुळे राजस्थानचा संघ या विजयासह प्लेऑफमधील शर्यतीत कायम राहिला आहे. या विजयाचा खरा हिरो वैभव सूर्यवंशी ठरला. त्याचे शतक हुकले असले तरी त्याने वादळी खेळी साकारत संघाच्या विजयात त्याने मोठे योगदान दिले आहे.

राजस्थानने सामन्याची नाणेफेक जिंकत लखनऊला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. जोश इंग्लिस व मिचेल मार्शच्या जोडीने १०९ धावांची भागीदारी साकारली. त्यात जोश इंग्लिसने ६० धावांची, तर मिचेल मार्शने ९६ धावांची खेळी केली. त्यानंतर निकोलस पुरनने १६ धावांचे, तर पंतने ३५ धावांचे योगदान देत संघाला २२० धावांपर्यंत नेले. लखनऊने दिलेल्या २२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वालने संघाला वादळी सुरूवात करून दिली. तो ४३ धावा करत बाद झाला. तर, वैभव सूर्यवंशीने ध्रुव जुरेलसह संघाच्या विजयाचा पाया रचला. या दोघांनी ४५ चेंडूत १०५ धावा केल्या. सूर्यवंशीने ३८ चेंडूत ९३ धावांची उत्कृष्ट खेळी केली.

## कामोठ्यात रंगला कुस्तींचा थरार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर जंगी कुस्त्यांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कुस्ती सामन्यांचे उद्घाटन माजी खासदार रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे व अरुण भगत यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश लांडगे यांच्यासह राज्यातील ज्येष्ठ पैलवान व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत नेपाळ, महाराष्ट्र राज्यासह पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि इतर राज्यांतील नामांकित मल्लांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात कुस्तीचा जल्लोष पाहायला मिळाला. मुख्य कुस्तीमध्ये रुस्तम-ए-हिंद सिकंदर शेख यांनी पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल लाली चमकोर याला चितपट करून मानाची गदा पटकावली. उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत यांनी बागा सिंघ याच्यावर मात केली. ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी यांनी हिंद केसरी संदीप कुमार याला पराभूत केले. महाराष्ट्र केसरी दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी माउली कोकाटे यांची लढत बरोबरीत सुटली. महिला गटात राष्ट्रीय पदक विजेती एकता शर्मा हिने अमेघा घरत हिला, उपमहाराष्ट्र केसरी वेदांतिका पवार हिने पलक यादव हिला, तर नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल रुबी थापा हिने उत्तराखंडच्या कोमल हिला पराभूत केले. या स्पर्धेत जवळपास ७५ सामने खेळविण्यात आले होते.

## विनेश फोगाटला दिलासा



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

स्पर्धात्मक कुस्तीत पुनरागमन करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या विनेश फोगाटला दिल्ली उच्च न्यायालयाचा थोडा दिलासा मिळाला आहे. भारतीय कुस्ती फेडरेशनच्या निवड चाचणी प्रक्रियेचा अभ्यास करू आणि त्यानंतर आपले निर्देश मांडू, असे न्यायालयाने म्हटले आहे. कुस्ती फेडरेशनबरोबर सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर विनेशने दि.१४ मे रोजी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

















कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)